# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
## दिनांक २१/०३/२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनाक २१/०३/२०१२ (दिनांक १६/०३/२०१२ का.प.क्र.३७ ची तहकुब सभा) रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१.२० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष

२. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव

३. स.स.डॉ.खान जफर अहेमद

४. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव

५. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष

६. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद

७. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास

८. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग

९. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी

१०. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल

११. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे

१२. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव

१३. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु

१४. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल

१५. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव

१६. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव

१७. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल

१८. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ

१९. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन

२०. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत

२१. स.स.श्री.चौधरी संजय सांडू

२२. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ

२३. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश

२४. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी

२५. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास

२६. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
२७. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
२८. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
२९. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३०. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३१. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३२. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३३. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३४. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
३५. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
३६. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३७. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
३८. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
३९. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४०. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
४१. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४२. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
४५. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
४६. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४७. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटु कुरेशी
४८. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
४९. स.स.श्री.खान आगा मिया खान
५०. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५१. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
५२. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५३. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
५४. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
५५. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत

५६. स.स.श्रीमती काळे शोभा पुखराज

५७. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव

५८. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा

५९. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

६०. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर

६१. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप

६२. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल

६३. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान

६४. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद

६५. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे

६६. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर

६७. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने

६८. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

६९. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम

७०. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव

७१. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश

७२. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव

७३. स.स.श्री.खान अक्रम करीम खान

७४. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन

७५. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने

७६. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

७७. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश

७८. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम

७९. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव

श्री.रेणुकादास वैद्य :सामाजिक कार्यकर्ते श्री.सुर्यकांतजी खैरे यांचे दुःखद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :श्री.सुर्यकांतजी खैरे यांनी औद्योगिक वसाहतीमध्ये विविध कामगाराच्या प्रश्नावर योग्य पध्दतीने न्याय देण्याचा प्रयत्न केला कामगारांचे प्रश्न ते जाणून घेत होते त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

.मा.महापौर :समाज सेवक स्व.सुर्यकांतजी खैरे यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

या वेळी स्व. सुर्यकांतजी खैरे यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

चर्चा :-

श्री.मीर हिदायत अली :आरसीएच -डॉक्टर नर्स यांना ७ महिण्यापासून पगार का दिला नाही

मा.महापौर :संबधीत अधिकारी नाही आल्यानंतर खुलासा होईल.

यावेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.रेणुकादास वैद्य :डॉ.पाडळकर नसतील तर त्यांचे वरीष्ठ अधिकारी यांचेकडून खुलासा घ्यावा.

डॉ.जफर खॉन :आरसीएच विभाग कुणाच्या अधिपत्त्या खाली चालतो.

श्री.खाजा शरफोद्यीन :सभागृहात इतर विभागाचे ही अधिकारी उपस्थित नाही जनतेच्या कामासाठी अधिका-यांना भेटण्यास जातो भेटत नाही अधिकारी सभेला उपस्थित नसेल तर माहिती कोण देणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :जे अधिकारी उपस्थित नाही त्यांनी परवानगी घेतली का?

श्री.मीर हिदायत अली :आरसीएच कर्मचारी यांना ७ महिण्यापासून पगार नाही मुदतवाढीसाठी पैशाची मागणी केली.

श्री.प्रमोद राठोड :मागिल सभेत म्हटले की या सभेत माहिती देवू आता अधिकारी खुलासा करण्यासाठी नाही.

श्री.गिरजाराम हळनोर :संबधीत अधिकारी विना परवानगी गैरहजर असेल तर कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :आरसीएच कर्मचा-याचे पगार झाले नाही ही वस्तुस्थिती आहे त्यांना ११ महिण्याची मुदत दिली होती मागिल बैठकीत आरसीएच भरती प्रकरणावर व त्यांना मुदतवाढ द्यायची की नाही  चर्चा झाली होती त्या बाबतची माहिती आस्थापनाकडून घेत आहोत माहिती आलेली नाही त्यांना मुदतवाढ दयायची की नाही हा प्रश्न होता पगारा बाबत विषय झालेला आहे संबधीत अधिकारी निर्णय घेतील.

श्री.मीर हिदायत अली :७ महिण्यापासून काम करतात मुदत संपण्या अगोदरच मुदतवाढ मिळणार नाही असे का कळविले नाही , कायम केले त्यांनी भ्रष्टाचार केला असेल यांना मुदतवाढ देणेसाठी प्रत्येकास ४० हजारची मागणी केली आहे

श्री.प्रमोद राठोड :मुदतवाढ देण्यास ७ महिणे उशीर का झाला.

श्री.रेणुकादास वैद्य :आरसीएच -२ चे कर्मचारी याचा सेवेचा कार्यकाळ संपला तर पुढील सेवेसाठी परवानगी घेतली का,जोपर्यत परवानगी देत नाही तोपर्यंत त्यांना कामापासून मुक्त ठेवा नसता तो भुर्दंड बसणार  त्यांना मुदत वाढ नाही म्हणून पगारी थांबल्या नेमके यात  भुमिका ठरली नाही त्यांना मुदतवाढ दयायची की नाही हा निर्णय जोपर्यत घेत नाही तोपर्यत पगाराचा विषय येतो का ,मुदत संपली त्यावेळेसच त्यांना कळविले नसल्याने हा प्रश्न आला रस्ता रूंदीकरणाचे काम चालू आहे परंतु इतर

विभागातील लाईट साफसफाई किंवा पाणी पुरवठयाचे कामे ही क्षमतेने होत नाही.लाईट स्वच्छतेच्या बाबतीत काय निर्णय झाले खुलासा करावा.

मा.महापौर :संबधीत अधिकारी आल्यानंतर खुलासा घेतला जाईल.

श्री.काशिनाथ केकाटे :३-४ महिण्यापासून विकास कामे का होत नाही.

श्री.मीर हिदायत अली :.वार्डात ड्रेनेजचे काम होत नाही वार्डात अधिकारी येण्यास तयार नाही वार्डात साफसफाई होत नाही कर्मचारी काम करण्यास तयार नसतील तर कार्यवाही करावी आरसीएच कर्मचारी यांना मुदतवाढ दिली नाही. त्यांचेकडून पैशाची मागणी होत आहे संबधीतावर कार्यवाही करावी.

डॉ.जफर खॉन :या बाबत तात्काळ निर्णय घ्यावा.

मा.महापौर :या बाबतीत कमेटी नेमून प्रशासन चौकशी करील.

श्री.कृष्णा बनकर :कर्मचा-यांचे पगार काढण्यास वेळ का होत आहे.

श्री.गिरजाराराम हळनोर:मुदतवाढीसाठी कुणी पैसे मागत असतील तर त्यांची चौकशी करावी.

श्री.अफसर खॅान :प्रत्येकाकडून मुदतवाढीसाठी ४० हजारची मागणी केली संबधीतावर कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :मुदत संपली त्यावेळेस सेवेची गरज नाही असे कळविले असते तर पैसे मागण्याचा प्रश्न येत नव्हता.

श्री.मीर हिदायत अली :आजही ते कर्मचारी काम करीत आहे ७ महिणे झाले पगार नाही.

मा.महापौर :दोन दिवसात या कर्मचा-यांना मुदतवाढ दयावी मुदतवाढ का दिली नाही अहवाल माझ्याकडे सादर करावा.

श्री.खाजा शरफोद्दीन :अनेक अधिकारी सभेला उपस्थित नाही आमच्या प्रश्नाचा खुलासा होणार आहे की नाही

श्री.अनिल जैस्वाल :सिडको हडको भागात बचत गटामार्फत साफसफाई होते त्या कर्मचा-यांना वेळेवर पेमेंन्ट दिले जात नाही.

श्री.महेश माळवतकर :१६ वार्डात बचत गटाच्या मार्फत स्वच्छता होते त्या कर्मचा-यांना तीन-तीन महिणे ऑर्डर देत नाही ३०००,३५०० इतका पगार दिला जातो तोही वेळेवर नाही या बाबत धोरण ठरवावे या कर्मचा-यांना ६-६ महिण्याच्या ऑर्डर दयाव्यात बचत गटाचे कर्मचारी यांना पगार वेळेवर होत नसल्याने दुसरीकडे काम मिळाल्यास तिकडे जातात त्यामूळे ३-४ दिवसा आड कचरा उचलला जातो अनेकदा असे होते की बचत गटाचे कर्मचारी नाही व मनपाचे ही स्वच्छतेसाठी नसतात फोन केल्यानंतर उचलत नाही ड्रेनेजची कामे होत नाही ४० टक्के जास्तीने टेंडर होते. अनेक ठिकाणचे लाईट ड्रेनेजचे काम होत नाही कचरा उचलला जात नाही बेसीक सुविधा मिळाव्या बचत गटाचे कर्मचारी यांना पेमेंन्ट वेळेवर दयावे.

श्रीमती छाया वेताळ :माझ्या वार्डात लाईट चा प्रश्न काही प्रमाणात सुटला कचरा मोठया प्रमाणात साचला आहे घटां गाडीचे लेबर देण्यात यावे नालीची साफसफाई होत नाही.

श्रीमती प्रिती तोतला :गुलंमंडी भागात २० लेबर सफाईसाठी होते ११ गैरहजर राहतात ६-७ मजूराकडून पुर्ण साफसफाई होत नाही.

श्रीमती किर्ती शिंदे :माझ्या वार्डात १८ मजूर होते १२ काम करतात ही संख्या वाढवावी लाईट बंद आहे कार्यवाही करावी.

श्रीमती आशाबाई मोरे :माझ्या वार्डात ११ कर्मचारी होते तीन घंटा गाडयावरील कर्मचारी काढून घेतले वार्डात ड्रेनेजचे पाणी वाहते महिलाच्या वार्डात कामे का होत नाही

श्रीमती रेखा जैस्वाल :माझ्या वार्डात ३ महिण्यापासून लाईट बंद आहे.एजन्सीला सांगावे असे उत्तर मिळते एजन्सीचा कालावधी संपला असेल तर पर्यायी व्यवस्था करावी.कोणकोणत्या वार्डात कामे होतात.कामे होण्यासाठी ठेकेदाराची बिले द्यावी आम्हाला सांगावे लागते.

श्रीमती प्रिती तोतला :गुलमंडी भागात मजूर गैरहजर राहतात. ५-६ मजूराकडून साफसफाई होत नाही पर्यायी व्यवस्था काय केली

श्रीमती रेखा जैस्वाल :लाईट चालू करावे कचरा उचलला जावा.

श्रीमती सत्यभामा शिंदे :वार्ड क्र. ७३ मध्ये इतर वार्डातील कचरा आणून टाकला जातो. वार्डात विकास कामे होत नाही.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्रीमती फिरदोस फातेमा:वार्डात ड्रेनेज लाईन फुटलेली आहे कचरा साचलेला असतो लाईट बंद आहे. तसेच विदयार्थ्यांना गणवेश हे चांगल्या प्रतीचे दयावेत गरीब लोकांची मुले शिक्षण घेत असतात शिलाई बरोबर केलेली नसते

श्रीमती सुनिता सोनवणे :माझ्या वार्डात कचरा उचलला जात नाही.

श्रीमती प्राजक्ता राजपूत:माझ्या वार्डात १५-२० मजूरांची गरज असतांना १० मजूर काम करतात कर्मचा-याची परस्पर बदली केली जाते १-२ दिवस वार्डतील साफसफाई होते त्यानंतर पुन्हा कचरा साचलेला दिसतो कचरा कुडयांची मागणी केली दिल्या नाही.

श्रीमती प्रिती तोतला :कचरा उचलण्यासाठी खाजगी वाहने किती आहेत.

श्री.अनिल जैस्वाल :डस्टबीन्स खरेदीसाठी इस्टिमेंट केले अधिकारी यांना विचारणा केली असता मला काहीच माहित नाही असे उत्तर मिळते घंटागाडी उपलब्ध होत नाही डस्टबीन्स देण्यात याव्यात.

श्री.गिरजाराम हळनोर :कचरा उचलला जावा म्हणून १२ व्या १३ व्या वित्त आयोगामधून १२ रिक्षा खरेदी करण्याचे ठरले होते किती रिक्षा आलेल्या आहेत.बचत गटाकडून कामे करून घेतल्यानंतर त्यांना पेमेंन्ट देणे बाबत कोण काम पाहते.स्व.निरीक्षक काय काम करतात.

श्री.बाळासाहेब मुंडे :रॅमकीचे किती कर्मचारी कोणत्या वार्डात काम करतात माहिती दिली नाही अदयाप डाटा तयार नाही.सांगण्यात आले.

या वेळी अनेक स.सदस्य डायस समोर कचरा उचलला जावा म्हणून मागणी करतात.

मा.महापौर :स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्रीमती रेखा जैस्वाल :स.सदस्य यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाची दखल घ्यावी.

श्री.अनिल जैस्वाल :संबधीत अधिकारी यांची त्या विभागात काम करण्याची क्षमता नसेल तर त्यांचेकडून चार्ज काढावा.

घन कचरा व्यवस्थापक:रॅमकीने डिसेंबर २०१२ मध्ये काम बंद केले त्यानंतर मनपाने तात्पुरत्या स्वरूपात कचरा उचलण्याची व्यवस्था केली एकूण ९५ वाहनाद्वारे कचरा उचलला जातो १२०-१४० ट्रिपा होतात.रॅमकीची वाहनाची क्षमता जास्त आहे आपल्याकडील वाहनातून कचरा जागेवर लगेच पंपीग करता येत नाही कचरा उचलून टाकावा लागतो त्यामूळे वेळ लागत आहे काही वाहने खराब झालेली आहे संख्या कमी असल्यामूळेही वेळ लागतो.

श्री.रेणुकादास वैद्य :यापूर्वी महापालिका कचरा उचलण्याचे काम करीत होते रॅमकीची यंत्रणा घेता येते का नसता आपली यंत्रणा ठेवावी वाहने लावावी अनेक भागात कचरा साचलेला दिसतो पुर्वी महापालिका ज्या पध्दतीने काम करीत होते त्या प्रमाणे करावे.

श्री.अशोक बेहडे :बचत गटाचे कर्मचारी यांना ३ महिण्यापासून पेमेंन्ट का दिले नाही.

श्री.महेश माळवतकर :बचत गटाचे कर्मचारी यांना तात्काळ पेमेंन्ट करावे.

घनकचरा व्यवस्थापक :या संदर्भात संचिका प्रस्तावीत केली असून कार्यवाहीसाठी आहे.

श्री.नासेर खॉन : यापूर्वी मनपाचे कर्मचारी साफसफाई करीत होते त्यांचेकडून काम करून घ्यावे.

मा.उपमहापौर : रॅमकीने काम बंद करण्याची नोटीस दिल्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात खाजगी वाहने लावावी.व महापालिकेने कचरा उचलावा असे ठरले होते. त्यानंतर पुन्हा बैठक झाली त्यात वार्ड सभापती स.पदाधिकारी प्रशासकीय अधिकारी आणि मा.आयुक्त सुध्दा होते वार्डातील कचरा उचलणे व साफसफाई करणे हे वेगवेगळे विषय आहे.झोन मधील काही ठिकाणचा कचरा उचलण्याचे काम हे खाजगी तत्वावर करीत होतो.यात्रिकी विभागाचे काही वाहने लावण्यात आले होते दै वेतनावर कर्मचारी घेतले त्यावेळी पदाधिकारी यांनी असा निर्णय घेतला की झोनवाईज कचरा उचलण्याचे टेंडर काढावे एका एजन्सीला काम दिल्यानंतर काम बंद केल्यास कचरा साचलेला दिसतो तसे न करता ६ वार्ड वाईज टेंडर काढावे.बचत गटाचे कर्मचारी मा.महापौर यांना भेटले त्यांनी पेमेंन्ट बाबत वार्ड अधिकारी हे घनकचरा व्यवस्थापक,लेखा विभागाकडे पाठवितात या प्रोसेसला दीड दोन महिणे लागतात आताच म्हटले संचिका प्रोसेस मध्ये पगार दिला नाही म्हणून कचरा उचलत नाही असे कर्मचारी सांगतात.१ तारखेला पेमेंन्ट करावे लागणार हे लक्षात घेता १५ तारखेला संचिका पाठवावी.यापूर्वी वार्ड अधिकारी , जवान सर्व सकाळी ४ वाजता साईटवर राहत असेल त्यांचेवर नियत्रंण ठेवण्यासाठी विभाग प्रमुखाना नियुक्त केले होते.ते सकाळी साईटवर हजर असायचे तेंव्हा साफसफाई होत असे वार्ड अधिकारी साईटवर गेले तर सर्व साफसफाई होत असे जे हजर नसतात त्यांना दंडात्मक कार्यवाही केली जात असे एक दीड वर्षात अशी कार्यवाही केली का ही कार्यवाही होत नाही म्हणून कर्मचा-यांवर नियत्रण राहिले नाही.आजही

रस्त्यावर कचरा दिसतो तो का उचलला जात नाही. तात्पुरत्या स्वरूपात महापालिकेने काम करावे असे ठरले होते वार्ड वाईज ६ टेंडर का काढले नाही काढले नसेल तर ते काढावे कच-याच्या गाडीवर ताडपत्री टाकली जात नाही कचरा रस्त्यावर उडून पडतो.वार्ड अधिकारी यांनी सकाळी साईटवर हजर राहायला पाहिजे तसे होत नाही.या सर्वांची अमलबजावणी व्हावी.

श्री.कृष्णा बनकर : ६ वार्ड कार्यालयासाठी विभाग प्रमुखाची नियुक्ती केली होती त्याप्रमाणे पुन्हा नियुक्ती करावी कर्मचा-यांचे पगार देण्यात यावे.

श्री.महेश माळवतकर :बचत गटांच्या कर्मचा-यांना पेमेंन्ट का दिले नाही ३ महिणे झाले.

श्री.किशोर नागरे :सर्व नियोजन पावसाळा सूरू होण्यापूर्वी २ महिणे अगोदर करावे पावसाळयात कच-याचा प्रश्न सुटत नाही.

घन कचरा कक्ष प्रमुख :जानेवारी २०१२ पर्यंत आरसीएच चे कर्मचारी यांना पेमेन्ट दिलेले आहे.

श्री.महेश माळवतकर :३ महिणे झाले त्यांना पगार नाही १२५रू दै.वेतनावर काम करणारे कर्मचारी आहे त्यांना वेळेवर पेमेन्ट केल्यास काम करतील.

श्री.सुशिल खेडकर :आताच मा.उपमहापौर यांनी ६ वार्डाचे ६ टेंडर काढण्या बाबत म्हटले त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी साफसफाईसाठी खाजगी मजूर लावले त्यामूळे अनेक कर्मचारी काम करीत नाही असे असतांना त्यांचा पगार काढला जातो याकडे लक्ष देण्याची गरज आहे कोणीही काम करीत नाही वार्ड अधिकारी लक्ष देत नाही. त्याचा पगार काढला जातो याची दखल घ्यावी.

मा.महापौर :या संदर्भात मा.आयुक्त खुलासा करतील.

श्री.महेश माळवतकर :बचत गटाचे कर्मचारी यांना शुन्य बॅलेन्स वर बँकेतून पेमेन्ट मिळावे.

श्रीमती प्राजक्ता भाले :वार्ड ब समितीमध्ये किती मजूर आहे,माझ्या वार्डात मजूर कर्मचारी कमी आहे तसेच बचत गटाची प्रोसेस काय आहे खुलासा करावा.

शहर अभियंता :घनकचरा संबधी नवीन निविदा काढणे व यंत्रसामुग्री बाबत प्रश्न उपस्थित केले डिसेंबर २०११ पासून रॅमकीने काम बंद केले त्यानंतर खाजगी व काही महापालिकेची यंत्रणा उभी करून कचरा उचलण्याचे काम चालू आहे.६ वार्डसाठी स्वतंत्र निविदा काढण्यास हरकत नाही परंतु महापालिका व रॅकमी कंपनीचा मा. न्यायालयात प्रकरण चालू आहे मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणाची चौकशी साठी मा.न्यायाधीशाची नेमणूक केली त्या संबर्भात त्यांनी १४ तारखेला बैठक आयोजीत केली आहे. नवीन निविदा काढून कचरा उचलण्याची परवानगी दयावी. महापालिकेचे हेच म्हणणे आहे परवानगी मिळाल्यास कचरा उचलण्यासाठी सहा वार्ड निहाय निविदा काढता येतील.आता निविदा काढल्या तर रॅमकी मुक्त होईल कार्यवाही थांबेल ती कंपनी प्रकरणातून सूटू शकते त्यासाठी १४ तारखेला संबधीत मा.न्यायालयाची परवानगी घेवून नंतर निविदा काढल्या जातील.

श्री.कृष्णा बनकर :झोनल कमीशनर नेमावे त्यामूळे कचरा उचलण्यावर नियत्रण राहील.

शहर अभियंता :कचरा उचलला का जात नाही याची क्रॉस चेकींग करीत आहोत.

श्री.अशोक बेहडे :बचत गटाचे कर्मचारी यांचे पेमेन्ट का झाले नाही.

श्री.किशोर नागरे :पावसाळा सुरू होण्यापूर्वी कचरा उचलण्या बाबत टेंडर काढणे व इतर ज्या उपाययोजना करायच्या त्या कराव्यात.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.न्यायालयाचा निर्णय जो लागेल तो लागेल ,कचरा उचलणे हे महापालिकेचे काम आहे.सुपव्हिजनसाठी झोनल अधिकारी नेमावे कामावर नियंत्रण राहिल.

श्री.काशिनाथ कोकाटे : १४०० कर्मचारी महापालिकेकडे कायमस्वरूपी आहेत.काही वार्डाचे यापूर्वी यात्रिंकी विभागाच्या वतीने कचरा उचलण्याचे काम होत होते.ती यंत्रणा कमी झाली नाही नियोजन करणे गरजेचे आहे.यंत्रसामुग्रीला परवानगी दिली कर्मचा-यांचे समान वाटप झाले नाही जे कामात कुचराई करतात कार्यवाही करावी.वार्ड वाईज निविदा काढणार असेल तर या १४०० कर्मचा-यांना कोणते काम देणार ,नियोजन करून कार्यवाही करावी बचत गटाचे कर्मचारी यांना ३ महिण्यापासून पेमेन्ट नाही ११ महिण्याची मुदतवाढ दयावी ,३-४ महिणे उशीला मुदतवाढ देतात पगार वेळेवर देण्यात यावे.

श्रीमती किर्ती शिंदे :मजूर कर्मचारी यांची बदली परस्पर होते माझ्या वार्डात १८ मजूर होते १२ काम करतात.वार्डातील पुर्णपणे साफसफाई होत नाही.

मा.आयुक्त :काही दिवसापासून कचरा उचलण्याचा प्रश्न निर्माण झाला अधिकारी कर्मचारी यास कारणीभूत आहे रॅमकीने काम सोडले त्यानंतर महापालिकेची यंत्रणा कामाला लागली ती सक्षमपणे झालेली नाही रॅमकी ची नियुक्ती केली त्यावेळीही महापालिका सक्षम होती तरीही नियुक्ती केली महापालिका सक्षम होती हा मुद्या समोर आला आता रॅमकीने काम सोडले तर महापालिकेकडून काम सक्षमपणे होणे आवश्यक होते ,दुर्दैवाने ते झाले नाही रॅमकी गेल्यानंतर ८-१५ दिवस चांगले काम केले रॅमकी पेक्षा जास्त कचरा महापालिकेच्या मजूरांनी उचलला १००-१५०मजूर वाढवले नंतर कामाची गती कमी झाली बचत गटाचे कर्मचारी पेमेन्ट बाबत उपआयुक्त प्र., घनकचरा प्रमुख , मुख्यलेखाधिकारी, वार्ड अधिकारी यांनी एकत्रित बसून सोमवार पर्यत पेमेंन्ट करण्याची कार्यवाही करतील.प्रभाग निहाय टेंडर काढण्यास हरकत नाही परंतु रॅमकी व महापालिकेचा जो काही वाद मा.न्यायालयात चालू आहे त्या बाबत टेंडर काढतांना हे नमूद करावे की जो काही निकाल लागेल त्यावर अवलंबून राहिल ६ प्रभागात तातडीने टेंडर काढायला हरकत नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :१४०० कर्मचारी काम करतात त्या बाबतीत काय निर्णय घेणार आहे.

मा.आयुक्त :जे कर्मचारी आहे त्यांचेकडूनही काम करून घेणार मशीनरी आहेत न्यायालयीन प्रकरणातून काही अडचण येवू नये म्हणून त्याचा वापर करता येत नाही.आज महापालिकेकडे गाडया आहे मशीनरी आहे कर्मचारी आहेत आताच शहर अभियंता यांना सुचना दिल्या की रॅमकी काम करीत नाही सोडून जातील बदलून जातील त्याचा वापर आता

महापालिकेने करून घ्यावा.काही वार्डात मजूराची संख्या कमी जास्त असेल प्रशासनाच्या स्तरावर बैठक घेवून मजूराची संख्या प्रत्येक वार्डात समान राहिल यासाठी वार्डाचे क्षेत्र व कचरा-याचे प्रमाण याचा विचार करून कर्मचारी आठवडा मध्ये वार्ड निहाय व निवडणूक वार्ड निहाय कर्मचारी दिले जातील याची अमलबजावणी १ एप्रिल पासून होईल अनेक कर्मचारी यांचे जागेवर दुसरे लोक २००० रू प्रमाणे काम करतात तसे होणार नाही यासाठी वार्ड अधिकारी यांचे कन्ट्रोल राहिल.बदल्यात दुसरे लोक काम करतात प्रकार थांबविण्याची गरज आहे १ तारखेपासून हजेरी तपासणीचे काम सुरू होईल प्रत्येक वार्ड कार्यालयासाठी इनचार्ज अधिकारी देवू एक दिवस कर्मचारी गैरहजर असेल तर २ दिवसाचा दंड व २ दिवस गैरहजर असेल तर ५ दिवसाचा दंड केला जाईल जे गैरवर्तन करतील त्यांचेवर कार्यवाही होईल नेमून दिलेल्या ठिकाणी त्या कर्मचा-यानी काम करायला पाहिजे जास्त काम करून कचरा उचलला पाहिजे स.सदस्य यांचे मार्गदर्शनानुसार अधिकारी एनजीओ यांचे मार्फत १ तारखेपासून कसे चांगले काम करता येईल हे बघीतले जाईल.

श्री.गिरजाराम हळनोर : १० मिनिटासाठी सभा तहकूब करावी (वेळ दु.३.०० वा. पुन्हा सभेला सुरूवात दु. ३.४० वा.)

श्री.अफसर खॉन :रस्ता रूंदीकरणाचे काम हाती घेतले एक रस्ता घेतल्यानंतर आठ दिवसात पुर्ण करणार असे म्हटले होते परंतु कामात गती नाही रस्ते वाहतुकीस खुले नाही पाण्याची लाईन फुटलेल्या दिसतात पाईप नाही सांगतात ,ड्रेनेज पाणी रस्त्यावर वाहते तातडीने कशी कामे होतील याकडे लक्ष देण्याची गरज आहे.किराडपूरा येथील रस्त्याचे कामही ताबडतोब करावे.

डॉ. जफर खॉन :कैलासनगर किराडपूरा तसेच माझ्या वार्डात ड्रेनेजची मोठी समस्या रस्ता रूंदीकरण मोहिम मूळे झाली या भागात मी स्वत: पाहणी केली नागरीकांचे आरोग्य धोक्यात आहे घाटी,महापालिकेच्या व विविध खाजगी दवाखान्यात लोकाना उपचारासाठी जावे लागते पावसाळया अगोदर रस्ता रूंदीकरणासाठी आवश्यक ती सर्व कामे करावी नसता लोकशाही मार्गाने लढा दयावा लागेल.रस्त्यावर अनेक ठिकाणी मलबा पडलेला ,केंव्हा उचलणार केलेली कार्यवाही धडाडीची परंतु जे आऊटफुट मिळायला पाहिजे ते मिळत नाही ताबडतोब समस्या सोडवाव्यात.

श्री.नासेर खॉन :रस्ता रूंदीकरणामूळे पाणी ,ड्रेनेज लाईन फुटल्या, लाईट बंद पडले २०-३० वर्षापासूनचे थांबलेले काम सुरू केले चांगले काम होत आहे म्हणून सत्कार केला,सिल्लेखाना भागात एका जागेवर अतिक्रमण काढण्याचे सांगितले कार्यवाही केली नाही एकीकडे रस्ता रूंदीकरण होते तर दुसरीकडे अतिक्रमण १ ते दीड फुट अतिक्रमण होते ते काढण्यासाठी अधिकारी यांनी दमदाटी केली लोक विकासासाठी जागा

खाली करून देत आहे अदयाप त्यांना मोबदला दिला नाही.अशा पध्दतीने कार्यवाही होत असेल तर योग्य नाही.खुलासा घ्यावा.जे काढायचे सांगितले ते अतिक्रमण काढले जात नाही. दोन महिण्यापासून सांगतो कार्यवाही होत नाही.

श्रीमती सविता सुरे : मयूर पार्क सर्वे नं १७२ मध्ये ओपनस्पेसवर बांधकाम चालू आहे मागिल बैठकीत या बांधकामास स्थगिती दिली व समिती नेमण्यात येईल असे म्हटले त्या समितीने काय कार्यवाही केली माहिती दयावी नसता मी उपोषणास बसणार आहे.

श्री.गिरजाराम हळनोर :परवानगी कशी दिली अहवाल मागविला होता आला का?

श्री.विजय वाघचौरे : कोकणवाडी येथे एक इमारत धोकादायक झाली. त्या बाबतीत कार्यवाही का झाली नाही.

प्रशासकीय अधिकारी :सिल्लेखाना भागात एका घराजवळ एक ते सव्वा मीटर माती टाकलेली आहे लाकडी घर आहे समोरच्या भागातील लोकांची त्यामूळे भाडंणे झाली लाठीचार्ज करावा लागता एक फुट सोडले तरी का सोडले लोकांचा आमच्यावर आरोप होता ते एक ते एव्वा मीटर पूढे आहे नंतर आमच्यावर आरोप होतात.त्यासाठी त्यांना वेळ दिली उदया सकाळी १०.०० वाजेपर्यंत काढावे नसता महापालिका काढून टाकेल.१ महिण्यापासून वेळ दिला काढले नाही आता १२ तासाची मुदत दिली त्यांचा अक्षेप असेल तर त्यांनी तशी प्रशासनाकडे तक्रार करावी.

श्री.गिरजाराम हळनोर :तोडू नये असे त्यांचे म्हाणणे नाही परंतु स.सदस्य यांनी एका अतिक्रमण बाबत तक्रार केली त्या बाबत कार्यवाही का केली नाही.

श्रीमती प्रिती तोतला :यापूर्वी गुलमंडी येथे अतिक्रमण पाडण्यासाठी टीम आली श्री.संजय नावाचे व्यक्ती यांची दीड फुटाच्या जागेसाठी त्याचे ८-१० फुटाचे नुकसान केले.श्री.तणवाणी साहेब यांनीही सांगितले अधिकारी कर्मचारी यांनी त्यांना आरेरावीची भाषा केली,श्री विघाते यांना संबधीत व्यक्तीला नोटीस देवू नये सांगितले परंतु त्यांनी नोटीस दिली जागेच्या प्रकरणात कोर्टाचा स्टे आणलेला आहे तरी त्यांना नोटीस दिल्या जाते कोर्टाचा स्टे असेल तर त्या संबधी कागदपत्र विभागाकडे असेल त्यानुसार कार्यवाही करायला पाहिजे.

प्रशासकीय अधिकारी :ओपनस्पेसच्या संदर्भात आहे संबधीतास नोटीस पण दिली रस्ता रूंदीकरण मोहिम चालू आहे त्यामूळे काम थांबलेले आहे.जी मार्कींग केले त्यानुसार रोड वाईडींग करणार सिल्लेखाना येथील प्रकरणाच्या बाबतीत संचिका पूर्ण प्रोसेस होवून मा.आयुक्ताच्या मान्यतेसाठी आहे २-४ दिवसात कार्यवाही होईल.कोकणवाडी येथील इमारतीच्या बाबतीत ४८ तासात कार्यवाही करण्यात येईल.

मा.महापौर :स.सदस्य श्रीमती सुरे यांचे वार्डातील ओपनस्पेस बाबत खुलासा करावा.

उपअभियंता (न.र) :या प्रकरणा ज्यांचे कडे माहिती आहे ते अधिकारी हे मा.न्यायालयात कामानिमित्ताने गेलेले आहे.ते आल्यानंतर माहिती घेता येईल

श्रीमती साधना सुरडकर:रस्ता रूंदीकरण होते दुसरीकडे शहरातील अतिक्रमणाकडे दुर्लक्ष होते शहानुरमियॉ दर्गा चौकात दोन महिण्यापूर्वी १ टपरी होती आता तेथे १४ टप-या झाल्या ,सायंकाळी वाहने रस्त्याच्या कडेला उभी असतात ,अपघात होतात.तक्रार दिली तातडीने कार्यवाही करावी.

श्री मीर हिदायत अली :आरसीएच कर्मचारी यांना ७ महिण्यापासून पगार नाही मुदतवाढीसाठी पैशाची मागणी केली

मा.महापौर :शहानुरमियॉ दर्गा चौकात असलेले अतिक्रमण त्वरीत काढावे.व अहवाल सादर करण्यात यावा आरसीएच कर्मचारी यांचे बाबतीत खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकिय अधि.: आरसीएच मध्ये ४३ कर्मचारी कार्यरत असून यांना करार पध्दतीने नेमणूक दिली असून आरसीएच २ हा प्रकल्प मार्च २०१२ मध्ये संपुष्टात येत आहे.या संबधी संचिका नोव्हेंबर पासून सादर केली मान्यतेसाठी काही प्रशासकीय अडचणी आलेल्या आहेत.यानतंर फेब्रुवारी-मार्च मध्ये करार संपतो आहे.मार्च २०१२ नंतर हे कर्मचारी महापालिकेत समाविष्ट संदर्भात अस्थापनाकडे संचिका आहे मुदतवाढीच्या संदर्भात संचिका मध्ये सबमिशन केलेले आहे. मान्यता झाल्यानंतर तपासून पगार अदा करण्या बाबत कार्यवाही करता येईल

श्री.मीर हिदायत अली :मुदतवाढ देण्यास ७ महिने उशीर का झाला

आरोग्य वैद्य. अधिकारी :ऑक्टोबरमध्ये संचिका पाठविलेली आहे नोंव्हेंबर पासून या कर्मचा-यांचे पेमेंन्ट नाही वेळोवेळी पुर्तता करून संचिका सादर केली मुदतवाढ मिळाल्यास पुढील कार्यवाही करता येईल

डॉ.जफर खॉन :आरसीएच कर्मचा-यांचे पेमेन्ट कोण देते.

आरोग्य वैद्य अधिकारी :शासनाकडून यासाठी पैसा येतो मार्च २०१२ नंतर हे कर्मचारी राहिल्यास महापालिकेला खर्च करावा लागेल. त्यासाठी मंजूरी लागेल.

मा.महापौर :संबधीत कर्मचा-यांचे पगार लवकरात लवकर देण्याची कार्यवाही करावी व अहवाल सादर करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :त्यांचा पगार देण्याची मागणी होते त्यांना महापालिकेत मर्ज केले का सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली का ४ वर्षासाठी त्यांना करार पध्दतीने घेतले होते नंतर शासनाने अनुदान देण्याचे बंद केले त्यांना महापालिकेच्या सेवेत मर्ज केल्यानंतर त्यांना पेमेन्ट देण्याचा प्रश्न येतो तसा प्रस्ताव प्रशासनाने सभागृहासमोर आल्यास कार्यवाही करता येईल.

श्री.विजय वाघचौरे :शासनाकडून यासाठी किती अनुदान आले व कशासाठी खर्च केले माहिती दयावी.

मा.महापौर :येणा-या बैठकीत तसा प्रस्ताव सभागृहासमोर सादर करावा मागिल बैठकीत या संदर्भात तत्वतः मान्यता दिली आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :३ महिण्यापासून रस्ता रूंदीकरण साठी ३० रस्ते घेतले अधिकारी कर्मचारी कामावर केंद्रीत झाले जलवाहिनी ,लाईटपोल सीप्टींगची कामे किती रस्त्यावर काम पुर्ण केले नियोजन काय केले सर्वीस लाईन सीप्ट केल्या का किती रस्त्यावर काम चालू आहे, टीडीआर व

एफएसआय दिला कितींना घरे पर्यायी जागा दिली.मध्यवर्ती भागात मिळकती पाडल्या तेथे काम सुरू नाही प्रशासनाने या बाबत काय नियोजन केले काही रस्त्याचे मायनर बॉडीफिकेशन करणे गरजेचे आहे ३५ मीटर रस्त्यावरील काढले काही प्रॉपर्टी धारकाचे २-२ प्रॉपर्टी पाडल्या पिसादेवी जो हायवेला मिळणार तो रस्ता ३६ मीटर ,किती रूंद करणार तसेच बाबा पेट्रोलपंप ते रेल्वेस्टेशन रस्ता ३६मीटरचा आहे तेथील नागरीकानी ३० मीटर नुसार पजेशन घेतले ४० मीटरचा रस्ता असेल तर तो शेवटपर्यंत ४० मीटरच रूंद व्हावा वाहतुकीच्या दृष्टीने रस्ते नियमानुसार रूंद करावे.

श्रीमती रेखा जैस्वाल :माझ्या वार्डात दोन ओपनस्पेस काम चालू होते एक काम झाले दुसरे अर्धवट , बील थांबविले म्हणून काम थांबले सत्य परीस्थिती काय माहिती घ्यावी.

श्री.कृष्णा बनकर :भिमनगर भावसिंगपूरा भागात २०X३० चे प्लॉटीक मा.आयुक्त यांचे आदेशानुसार बंद करण्यात आले आता पुन्हा १० एकर जागेवर प्लॉटींग झाली आरसीसीची घरे झाली संबधीत विभगास माहिती दिली कुणी अधिकारी आले नाही नंतर तेथे विकास कामे करण्याची मागणी तेथील नागरीक नगरसेवकांकडे करतात या बाबत कार्यवाही करावी प्लॉटींग होत आहे ते थांबवावे.

श्री.विजय वाघचौरे :लाईटचे टेंडर बाबत काय झाले माझ्या वार्डात पुर्णपणे लाईट बंद आहे

श्री.गिरजाराम हळनोर :रस्ता रूंदीकरण मोहिम चालू आहे आतापर्यंत किती रस्त्याचे भुसंपादन केले ज्यांच्या मालमत्ता बाधीत झाल्या त्यांना महापालिकेने लेखी काही दिले का टीडीआर व मोबदला कसा देणार हे सांगावे तसेच पावसाळयापूर्वी या सर्व रस्त्याची कामे व्हावी.नसता पुन्हा अतिक्रमणे होतील तसेच रस्त्यामधील केबल, ड्रेनेज ,पाण्याची लाईन व लाईटची शिफ्टींगची कामाचे नियोजन करून तातडीने कार्यवाही व्हावी २३ तारखेला रामनवमी असल्याने मोठी मिरवणूक निघणार आहे त्या रस्त्यावर मलबा पडलेला असून त्या रस्त्याचे ही काम लवकर हाती घ्यावे.

मा.उपमहापौर :रस्ता रूंदीकरणाचे चांगले काम हाती घेतले त्याबध्दल सभागृहाने अभिनंदन केले.सर्वांनी पैशाच्या माध्यमातून यासाठी मदत केली मा.सचीव राज्य शासन यांनी सुध्दा या कामाबाबत अभिंनदन केले.यासाठी सर्व स.पदाधिकारी स.सदस्य याचीही मदत झाली. मार्कींग केली त्यानुसार ८० टक्के लोकांनी स्वतहून काढले काही जेसीबी लावून काढून घेतले काही ठिकाणी जेसीबी लावून काढावे लागले जो रस्ता ५० फुटाचा असेल तो ५० फुटाचाच झाला पाहिजे ज्या रस्त्याची ज्यांनी मार्कींग केली त्यांना हटवून दुसरे अधिकारी नेमावे कारण गुंलमडी रस्त्यावर काम केले काही इमारती तेथे मागेपूढे आहेत.एका जागेच्या संदर्भात पेपरमध्ये बामती आली होती ती वस्तुस्थिती आहे जसे किराडपूरा भागात ३ दिवसात २०-२५ अतिक्रमण काढले तसे

गुलमंडी,एमजीएम कैलासनगर रस्त्यावर आहे. या रस्त्याचे डांबरीकरण होण्या अगोदर तेथील अधिकारी बदलावे लक्ष्मण चावडी ते एमजीएम ६० फुट असेल तर तो तेवढाच रूंद व्हावा हेरीटेज इमारती चूकीने पाडल्या नंतर आम्ही मार्कींग केली पाडायचे सांगितले नोटीस दिल्या गेल्या का पाडल्या म्हणून विचारणा झाली. रस्ता होणे आवश्यक आहे. चुक झाली असेल तर जास्त खोलवर कायदयाने जावू नये त्या नोटीसचा कुणी कोर्टात जावून फायदा घेईल.स्वतहून नागरीकांनी काढले एवढेच सांगावे किती रस्त्याचे कामे पुर्ण झाली किती लोकांना एफएसआय टीडीआर दिला टीडीआर बध्दल अनेकांना माहित नाही टीडीआरची योजना कार्यान्वित करावी त्याची यादी घ्यावी ज्यांनी अगोदर अर्ज दिले त्यांची नावे समोर आली तर मोठया प्रमाणात टीडीआर घेतील.भुसंपादनासाठी पैसे देण्याची गरज पडणार नाही.एफएसआय टीडीआर कितींना देणार आहे जर त्यांनी मोबदला मागणी केली तर प्रशासनाची काय भुमिका आहे.किती मालमत्ता हस्तातरीत केल्या या सर्व माहितीचा लेखाजोखा दयावा.

श्री.सुर्यकांत जायभाये :मागिल ०२ वर्षातील बजेट मधील कामे झालेली नाही काही वार्डात जास्तीची कामे झाली माझ्या वार्डात २ कोटीचे कामाचे टेंडर झाले अदयाप काम केले नाही.प्रत्येक वार्डात समान काम व्हावीत.ज्या कामाचे टेंडर झाले त्यास प्राधान्य दयावे.

मा.आयुक्त :रस्ता रूंदीकरणाची स.पदाधिकारी मा.खासदार मा.आमदार मा.मंत्रीमहोदय , मा.न्यायालय सामान्य नागरीक व प्रेस या सर्वांचे मोठे सहकार्य मिळाले त्यामूळे काम करता आले.शहराच्या दृष्टीने अतिशय मोठे व चांगले काम होत आहे बांधकाम , सुविधा संदर्भात जे ऐकायला मिळत होते त्यात मोठा बदल झाला चांगले आता ऐकायला मिळते सर्वांनी सहकार्य केल्यामूळे मी सर्वाना धन्यवाद देतो.काम चालू आहे आणखीही बरेच काम बाकी आहे सर्वाच्या सहकार्याची गरज आहे.पावसाळया अगोदर काम करणे आहे. ३० रस्ते् रूंदीकरणासाठी घेतले २२ रस्त्यावर जवळपास मार्कींग करण्यात आले त्यानुसार कार्यवाही सुरू केली लोकांना जागेचा ताबा दयावा म्हणून कळविले जे पाहिजे ते देवू अशा पध्दतीने काम सुरू केले काहीनी स्वतहून काढले ८ रस्त्यावर मार्कींग केले नाही २२ रस्त्यात १२६२ मालमत्ता बाधीत त्यात ७ हेक्टर ३३ आर जागा बांधीत आहे.९७.२६ कोटीची जमीन ताब्यात मिळाली जे पाहिजे ते देवू लोकांना त्यासाठी आवाहन केले २६९ लोकांनी अर्ज केले त्यापैकी परीपुर्ण अर्ज ८५ आले.कागदपत्राची पुर्तता नसलेले बाकी अर्ज आहेत ज्याच्या जागा बाधीत झाल्या त्यांना काय पाहिजे ३ दिवसात अर्ज मागवून त्याची छाननी करून कार्यवाही होईल ८५ अर्जापैकी २८ प्रकरणात १० लोकांना टीडीआर ८ लोकांना एफएसआय ९ प्रकरणात एफएसआयला तत्वत: मान्य केले १० प्रकरणात रोख रक्कम दिली असे ३७ प्रकरणात कार्यवाही

केली.कदाचित उदया पर्यत उर्वरीत प्रकरणात निर्णय होईल बाकीचे अर्जाची छाननी केली जाईल लोकांना ही कळविले जाईल की तात्काळ अर्ज करावेत प्रशासनाला निर्णय घेता येईल लोकांचे अर्ज येत नाही त्यांना माहिती नसेल लोक सभ्रमात आहे की टीडीआर एफएसआय घ्यावा की रोख रक्कम घ्यावी. कोर्टात काही प्रकरणे गेली तेथे त्यांना विचारणा केली जाते की पैसे पाहिजेत का परंतु संबधीत मिळकत धारकाने पैसे ऐवजी टीडीआर एफएसआय कडे गेल्यास त्यांना जास्त फायदा होईल पुर्वी जो रस्ता घेतला होता रोषणगेट ते सिडको या रस्त्यावर १६० मिळकती बांधीत होत्या तेथे ३.९७ कोटीची मागणी तेथील अनेकांनी टीडीआर एफएसआयची मागणी केली ५० संचिका दाखल कार्यवाही चालू आहे ५-६ लोकांनी पैशाची मागणी केली जवळपास १ कोटीपर्यत रक्कम दयावी लागणार जवळपास ५.५० कोटीची मागणी होती एफएसआय टीडीआर या माध्यमातून पैसे देण्याची गरज पडणार नाही. पैसे वाचणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय ते शहागंज रस्त्यात १२३ मालमत्ता होत्या त्यांना ६८ लक्ष मोबदला दिला परंतु त्यांनी आणखी २.१३ कोटीची मागणी केली.त्यांना टीडीआर एफएसआय देणार आहोत लोकांची तशी मानसीकता आहे. लक्ष्मण चावडी ते एमजीएम या रस्त्यासाठी ८ कोटीची मागणी होते त्यापैकी ५० लक्ष देणार उर्वरीत लोकांना टीडीआर एफएसआय देवून ते काम होईल पानदरीबा ते सराफा रस्त्यामध्ये २२ मिळकती असून ११ लक्षची मागणी केली असुन दिले नाही एफएसआय टीडीआरच्या माध्यमातून कार्यवाही होईल.अग्रेसन भवन ते लोटांकारजा मध्ये १७ मिळकती ६० लक्षची मागणी काम मोठे केले पैशाची मागणी कमी प्रमाणात करतात चार लोक कोर्टात गेले होते त्यांना पैसे देण्याची आदेशीत झाले तर १०-१२ कोटी सध्या आहेत इनकेस पैसे देण्याची गरज पडली तर तयारी ठेवली कर्मचा-यांचे पगार ३१ तारखेपर्यत थांबविले.वसुलीवर भर दिला आहे १०-१५ दिवसात जास्तीत जास्त वसुली होईल व लोकांना पैसे कसे देता येईल याकडे लक्ष देत आहेत जिल्हा हेडकॉर्टस हे जवाहरलाल नेहरू अर्बन मिशन मध्ये समावेश होत आहे या शहरात त्यात समावेश व्हावा ५०० कोटी मिळू शकतील ते त्यातून शहरातील जे कामे थांबली ती करता येईल मागच्याच आठवडयात जी रक्कम मिळायची त्या संदर्भात मुख्य सचिव यांचे सोबत बैठक झाली त्यातून ५७ कोटी चे दाखल केले राज्य शासनास ३६ कोटीचा प्रस्ताव दिला त्यातून पैसे मिळण्याची शक्यता आहे अल्पसंख्याकाच्या भागामध्ये सुविधा देणेसाठी ३०-३२ कोटीचा ची मागणी केली यापैकी २० कोटी देण्याचे मान्य केले प्रस्ताव देण्यास सांगितले १० कोटी तातडीने देवू असे म्हटले.तसेच समाज कल्याण विभागाकडून पैसेची मागणी करणार जेव्हा महापालिका चांगले काम करू पाहत आहे तेंव्हा पैसे मिळेल अशी अपेक्षा आहे नगरोत्थान व एसटीपीचा जो प्रस्ताव तयार केला हाती

घेतला सर्व स्थानीक लोकप्रतिनीधी व मंत्रीमहोदय यांचे स्तरावर पाठपूरावा होत आहे १-२ दिवसात सादर करणार आहोत यातून ३००-४०० कोटी १०० टक्के पैसे मिळण्याची शक्यता आहे.सर्व योजनेच्या माध्यमातून ५००-६०० कोटी मिळावे अशी अपेक्षा आहे.रस्ता रूंदीकरणामध्ये सर्व पैसा खर्च होईल कामे होणार नाही भिती असण्याचे कारण नाही सर्व भागात विकास कामे होतील तसेच रस्त्याच्या मधील जे ड्रेनेज ,गटारी , जलवाहिनी व लाईटची कामे करायची या संदर्भात शहर अभियंता माहिती देतील.

श्री.काशिनाथ कोकाटे :रस्त्याबाबत प्रशासनाची संकल्पना व जी माडणी केली ती चांगली आहे विविध माध्यमातून निधी मिळू शकतो ,निधी येण्यास वेळ लागेल. परंतु जे १०० टक्के लोकांच्या मालमत्ता निष्काशित झालेले आहे.मा.गौतम साहेब आयुक्त असतांना शहाबाजार व लेबरकॉलनी येथील मोठया प्रमाणात झोपडपट्टी निष्काशित करण्यात आली त्यावेळी त्या लोकांना सिडकोतील एन -१२ भागात पर्यायी घरे देण्यात आली तशी योजना आता आहेत का ज्यांना शिफ्ट करणार आहोत तेथे सर्व सुविधा वगैरे देण्याचे काय नियोजन असणार आहे.१२६२ मालमत्ता ताब्यात घेतल्या ८५ अर्ज लोकांचे आहे त्यांनी मागणी केली ,माझ्या मते टाऊन हॉल ते चेलीपुरा चौकी तेथून पूढे आझाद चौक पर्यंत रस्ता केला सर्व सोयी सुविधा केल्या तर त्यासाठी कागदपत्र दाखवावे लागेल मार्केट उघडावे लागेल ज्याच्या मालमत्ता निष्काशित झाल्या त्यांचेकडे आपले अधिकारी पाठवावे त्यांना मोबदला कसा , कशासाठी किती देणार याची माहिती देणेसाठी टीम तयार करावी.टीडीआर एफएसआय काय आहे हे लोकांना अदयाप समजले नाही. त्यासाठी एक टीम तयार करावी ज्या सर्वेनंबर मध्ये आराखडा तयार केला तेथे काय काय केले आहे किती प्लॉट` २०X३० चे देवू शकता शासनाची परवानगी यासाठी मिळू शकते असा प्रसंग यापूर्वी आला होता वसाहती बसवली होती एन १३ मध्ये ही २०X३० च्या प्लॉटला शासनाने परवानगी दिली होती तेथे सर्व सुविधा दिल्यानंतर शासनाने परवानगी दिली होती.

मा.आयुक्त :जो निर्णय घेतला तो अतिशय क्रांतीकारक आहे.ज्यांचेकडे पीआर कार्ड आहे त्यांना टीडीआर एफएसआय रोख रक्कम मोबदला म्हणून देणार ज्यांचे कडे पीआर कार्ड नाही परंतु ते २०-२५ वर्षापासून राहत होते त्यांची मिळकत ही रोड मध्ये गेली त्यांना ते लिगल जरी नसेल तरी त्यांचे घरे पाडली त्यांना २०X३० प्लॉट अधिकृतपणे करून देवू हर्सुल येथे महापालिकेची १० हेक्टर जागा आहे त्यातील प्लॉटचे मार्कींग केले.तसेच एससी आणि नवबौध्दासाठी काही प्रकरणे मंजूर झाली त्यासाठी २२ कोटी आहे.एससी आणि नवबौध्द यांना आवाहन की ज्यांची घरे पाडली गेली त्यांना इमारत बांधून देवून २ लक्षचा प्लॅट देण्याची व ७५० प्लॅटची या जागेवर करण्याची तरतूद आहे. प्लॅटचे क्षेत्रफळ ३३३ क्वे.फुट २ लक्ष पर्यंत आहे संबधीतानी महापालिकेकडे

अर्ज करावे ज्यांना आज राहण्याची व्यवस्था नाही त्यांचे साठी जे ९ नाईट सेंटर सुरू केले ६०० लोकाची राहण्याची सोय आहे ४०० लोक येथे व हर्सूल येथे तात्पुरता निवारा केला तेथे १५० असे एकूण ५५० लोकांना राहण्याची आजही महापालिकेकडे व्यवस्था आहे.ती करू शकतो.

श्री.कृष्णा बनकर :माझ्या वार्डात २०X३० चे प्लॉटींग चालू आहे ते बंद करावे.

शहर अभियंता :शासनाने जो डीपी प्लॅन मंजूर केला त्याप्रमाणे कार्यवाही करीत आहोत. २६ रस्ते घेतले १४ रस्त्याचे पूर्णपणे रूंदीकरण झाले ५ रस्त्याचे काम चालू आहे लोक त्यांची घरे स्वत:पाडून घेत आहे.बाकी रस्ते दुस-या टप्प्यात घेत आहोत. ज्या रस्त्याची बांधणी झाली त्यासाठी नागरीकांनी पुर्णपणे सहकार्य केले. चांगल्या सुविधा देणेसाठी विभागाकडून रस्त्याचे कामाचे अंदाजपत्रक तयार करणे ,निविदा काढणे कार्यवाही चालू आहे १९ रस्ते आहे त्यांची लांबी ६८.६८ किमी. यामध्ये जलवाहिनी टाकण्यासाठी ५.८७ कोटीचा खर्च हे काम समातंर जलवाहिनीच्या एजन्सीकडून करून घ्यायचे आहे जलनिस्सारण वाहिनीची रस्त्याच्या दोन्ही बाजूने व्यवस्था करणार, ५.९६ कोटी खर्च लागणार आहे.१४ रस्त्यावरील लाईटची कामे करण्यासाठी १२.७६ कोटीचा खर्च जीटीएलने महापालिकेकडे दिला ही रक्कम देणे बाबत अंतिम निर्णय झाला नाही जीटीएल महावितरण व एमएसईबी यांचे बोलणी चालू आहे.हा खर्च महापालिकेने न करता जीटीएल किंवा पुर्वी जी वितरण व्यवस्था होती त्यांनी करावा या धोरणात महापालिका आहे.ही कार्यवाही प्रगतीपथावर आहे हे शासन दरबारी मान्य होईल नंतर पुढील कार्यवाही होईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :जीटीएलला एलबीटी लावण्यास शासनाने मंजूरी दिली ती कार्यवाही होते का ?यापुर्वी थकीत बीलापोटी एमएसईबीने महापालिकेला नोटीस दिली होती विद्युत पुरवठा बंद करू असे म्हटले २ कोटी पेक्षा जास्त रक्कम भरू शकत नाही असे ठामपणे महापालिकेने सांगितले होते कार्यवाही केल्यास विद्युत बिलापोटी जे उत्पन्न होते त्या प्रमाणानुसार महापालिका एलबीटी लावेल असे सांगण्यात आले.आता शिफ्टीगंची कामे करण्यासाठी पैसे भरण्याची गरज नाही असे माझे मत आहे ती एजन्सी व्यावसायीक आहे उलट पोल साठी जागा देतो रस्त्याचे मेंन्टनंस करावे लागते तो खर्च होतो.तो खर्च व आता रस्त्यातील लाईटची जीटीएलकडून सर्व कामे करून घ्यावी महापालिकेला पैसे दयावे लागत असेल तर जीटीएलवर एलबीटी लावावी.

मा.महापौर :रेल्वेस्टेशन ते बाबा पेट्रोल पंप हा रस्ता पुर्वी विकास योजनेनुसार ३० मीटरचा होता आता ३५ मीटद रूंद करण्याचा आराखडा आहे तसेच क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन हा रस्ता पुर्वी ३५ मीटरचा व आता ४० मीटर रूंद करण्याचा विकास योजना आराखडा आहे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सदस्यांच्या भावना लक्षात घेता वरील रस्त्याची रस्ता

रूंदीकरणाची जी कार्यवाही ही नवीन ३५,४० मीटर रूंद विकास योजनेनुसार सुरू आहे परंतु सुरूवातीला या रस्त्याची रूंदी ३०,३५ मीटर रूंद होती त्यानुसार तेथील नागरीकांनी बांधकाम परवानगी घेवून भोगवटा प्रमाणपत्र सुध्दा घेतलेले आहेत त्यानुसारच या रस्त्याच्या बाजूला इमारती अस्तित्वात आहे असे असतांना नविन विकास आराखडयानुसार या रस्त्याची ३५ मी.४० मीटर रूंद करण्याची कायदेशीर प्रक्रिर्या पूर्ण केल्याशिवाय रूंदीकरणाची मोहिम हाती घेतली असेल तर ती नियमानुसार योग्य होणार नाही सदरील प्रकरणात महापालिका प्रशासनाने सर्व तांत्रिक बाबी तपासून सदरील सविस्तर अहवाल मा.राज्य शासनाकडे मार्गदर्शनासाठी पाठवावा. तसेच या दोन्ही रस्त्यावरील मालमत्ताची भागशः भुसंपादन पुर्वीच्या आराखडयानुसार करून रस्ता रूंदीकरणाची मोहिम हाती घ्यावी.

श्री.कृष्णा बनकर :भावसिंगपूरा अनधिकृत प्लॉटींग होत आहे कार्यवाही का केली नाही

मा.महापौर :खुलासा करावा तसेच चेलीपूरा भागात भुसंपादनासाठी ५५ लक्ष रू देवून सुध्दा जागा ताब्यात का नाही खुलासा करावा

प्रशासकीय अधि. :स.सदस्य श्री.कृष्णा बनकर यांचे वार्डात २-३ दिवसात कार्यवाही होईल.

श्री.संजय चौधरी :चिकलठाणा, मुकूंदवाडी भागात अनधिकृत प्लॉटींग व बांधकाम चालू आहे भावसिंगपूरा चिकलठाणा नारेगाव भागात सध्या मोठया प्रमाणात प्लॉटीग होत आहे होत असेलेले बांधकाम पाडण्यात यावे संबधीतावर गुन्हा दाखल करावे

प्रशासकीय अधिकारी :१५० ते १७५ लोकांवर गुन्हे दाखल केले आहे.

मा.उपमहापौर :जो मुळ प्लॉटचा मालकावर गुन्हे दाखल व्हावेत.

प्रशासकीय अधिकारी :खरेदी -विक्री करणारावर गुन्हे दाखल केले

श्री.काशिनाथ कोकाटे :इमारत निरीक्षक व प्लॉटींग जे करतात त्यांचेवर गुन्हे दाखल करावे.

उपअभियंता (न.र) :चेलीपूरा रस्त्याच्या जागेच्या संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.संजय चौधरी :मुकूंदवाडी चिकलठाणा भागात जालना रस्त्यावरील लाईट बंद ही जबाबदारी पीडब्ल्युडी की महापालिका कुणाची आहे.

श्री.महेश माळवतकर :महिण्यापासून लाईट बंद तक्रार कुणाकडे दयाची प्रश्न पडतो काही ठिकाणी कांप्रेहेन्सीव्ह तर काही उर्जा पध्दतीचे लाईट आहे संबधीत ठेकेदार १-१ महिणा भेटत नाही.लाईट लागणार की नाही या बाबत आज ठोस निर्णय घ्यावा.

श्री.विजय वाघचौरे :एजन्सीला काम दिले महापालिकेचा किती फायदा झाला.

श्री.बाळासाहेब मुंडे :स्ट्रीट लाईटसाठी एमएसईबीला ५ लक्ष रूपये दोन वर्षापूर्वी दिले काम केले नाही.

श्रीमती साधना सुरडकर:काही ठिकाणी दिवसा लाईट चालू रात्री बंद असतात सर्वीस लाईन टाकणार होते त्या टाकल्या नाही तसेच मेन रस्त्यावरील लाईट हे पीडब्ल्युडी यांचेकडे आहे असे ठेकेदार सांगतात वार्डातील स्ट्रीट लाईट

सुध्दा बंद आहे लाईटची समस्या तक्रार ५ लोकांना सांगावी लागते काम करण्यास आल्यानंतर १० लाईट बंद असेल तर २ लावले जातात.

श्री.विजय वाघचौरे :लाईटचे काम कोणाकडे आहे. वार्डातील लाईट लावल्यानंतर लगेच शॉक होतात असे असतांना ठेकेदाराचे बिल दिले जाते.

श्री.किशोर नागरे :ब-याच भागात लाईट बंद मटेरियल नाही म्हणून सांगितले जाते दीड महिण्यापासून लाईट बंद आहे ४ वार्ड मिळून टेंडर काढले तर चालेल नियंत्रण राहिल काम होईल टेंडर काढणार होते त्या बाबतीत काय कार्यवाही झाली

श्री.विजय वाघचौरे :महापालिकेतील लाईनमन काय काम करतात.

श्रीमती प्रिती तोतला :सर्वच वार्डात लाईटची समस्या अधिकारी यांना सांगून सुध्दा कार्यवाही नाही लाईनमन नाही कारण सांगितले जाते महापालिकेकडे ६ कर्मचारी यांचेकडे पात्रता आहे ते विद्युत पर्यवेक्षक म्हणून काम करू शकतात २ कर्मचारी यांना पदनाम दिले उर्वरीत चार कर्मचारी यांना पदनाम बदलून दिले तर ते लाईटच्या कामासाठी घेता येईल.६ झोनला ६ कर्मचारी दिले तर कामे होतील या ६ कर्मचा-यांना विद्युत पर्यवेक्षक एवढीच पेमेंन्ट देता त्यांना पदनाम देण्यास हरकत नाही.

श्री.गिरजाराम हळनोर :उपअभियंता ,कनिष्ठ अभियंता व लाईनमन किती , खाजगीकरण केले हे कर्मचारी काय काम करतात बीओटीवर टेंडर काढले समजले त्यात अटी शर्ती काय माहिती दयावी. पूर्वीचे लाईट काढून त्या ऐवजी उर्जा पध्दतीचे लावावे जे सेर्वींग होईल ते संबधीतास दयावे अशा पध्दतीने काम दिले होते आता तो ठेकेदार पैसे मिळत नाही म्हणून मटेरीयल देत नाही बरोबर नाही. महापालिकेकडे लाईनमन आहे ४-५ लोडींग रिक्षा घेतल्यास मेन्टंनसचे काम करू शकतात मटेरियल मागवून त्यांचेकडून काम करून घेवू शकतो आजही ठेकेदार महापालिकेचे कर्मचारी यांचेकडून काम करून घेत आहे स.सदस्य श्रीमती तोतला यांनी म्हटल्या प्रमाणे त्या कर्मचां-याना नियमाप्रमाणे पदनाम दयावे नाशिकच्या ठेकेदारास ठेका दिला तो नेमका काय दिला माहिती दयावी.

श्रीमती सुनिता सोनवणे :अजबनगर खोकडपूरा भागात लाईट बंद आहे ते चालू करण्यात यावे.

श्रीमती रेखा जैस्वाल :माझ्या वार्डात लाईट बंद आहे.अशा वेळी ठेकेदाराकडून दंड वसूल करणार अशा पध्दतीने ठेका दिला होता त्याप्रमाणे वसुल करावे ४ वार्ड मिळून लाईटचे टेंडर दयावे.

कार्य.अभियंता(विद्युत) :जालना रस्ता हा सार्वजनीक बांधकाम विभागाचा आहे तेथे लाईट लावत नाही जे महापालिकेचे एमएसईबीचे पोल आहे तेथे लाईट लावतो डिवायडर मध्ये मुख्य जालना रस्त्यावर बीॲण्डसीचे पोल आहे तेथे काम करू शकत नाही.सिडको हडको भागात कांप्रेहेन्सीव्ह पध्दतीने काम करीत आहोत कांप्रेहेन्सीव्ह पध्दतीने टेंडर अंतिम करण्यात आले आहे जो पर्यंत टेंडर निघत नाही तोपर्यत त्यांनीच काम करावे असे सांगितले वार्ड फ मध्ये श्री. सोनवणे काम करीत आहे स.सदस्य श्री.

मुंडे यांनी म्हटल्याप्रमाणे सदरचे कामासाठी रक्कम भरणा केली आहे ३१ मार्चच्या अगोदर काम चालू होईल.

श्री.विजय वाघचौरे :माझ्या वार्डातील बीओटीचे सर्व लाईट बंद आहे.

कार्य अभियंता(विद्यु.) :बीओटीवर जेथे काम दिले होते तेथील लाईट काढून एनर्जी सेव्हींग लाईट लावण्यात आले एजन्जी सेव्हीग किती होते त्यातील काही हिस्सा बीओटी धारक घेतात. जे कांप्रेहेन्सीव्ह टेंडर मागविले होते महापालिकेच्या फायदयाचे होत नव्हते म्हणून रिकॉल केले आहे.

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

मा.उपमहापौर :यापूर्वी लाईटचे टेंडर आले सुंदर अशी संकल्पना होती २५ हजार पोलवर सुरूवातीला १५ हजार व नंतर १० हजार पोलवर एनर्जी सेंव्हीग फिटींग लावणार एनर्जी सेव्हीग कशी होईल व , मेंन्टनन्स साठी काहीच खर्च लागणार नाही हे दाखविण्यात आले माझ्या वार्डात १०० टक्के लाईट बीओटीचे आहेत बीओटीवर देणेपुर्वी जर १२ लक्ष लाईटबील येत असेल तर एनर्जी सेंव्हीग केल्यानंतर ८ लक्ष बील येते त्यातील ४ लक्षची सेव्हीग झाली. ३७ टक्के नुसार महापालिकेला व ६७ टक्के नुसार संबधीताला मिळाले का किती सेव्हींग झाले.१०० टक्के काम बीओटीचे देणारे करणार होते श्री सोनवणे नावाचे व्यक्ती बीओटीचे काम बघतात तसेच वार्डातील मेन्टन्सचे काम ही तेच करतात.वार्ड क्र. ५० सुरानानगर येथे १ ही पैसा मेंन्टनन्स साठी खर्च करण्याची गरज नाही.असे शहरात जवळपास २५ हजार पोल आहे.३७ टक्के रक्कम जी सेव्हीग तसेच यापुर्वी जो लाईट मेंन्टनन्सचा महापालिकेला खर्च येत असे तो सुध्दा सेव्हील व्हायला पाहिजे.ज्यांनी बीओटीवर घेतले त्यांनी महापालिकेला पैसे दयायला पाहिजे ते उलट महापालिकेकडे पैसे मागतात हे बरोबर नाही २५ हजार पोल बीओटीचे सुरानानगर,ज्योतिनगर,व इतर ५-१० वार्ड तसेच सिडकोतही १०० टक्के बीओटीवर काम दिले असतांना बाहेरील एजन्सीला मेंन्टनन्सचे पैसे कशासाठी दिले जातात.गेल्या ७ वर्षापासून २५ हजार पोल बीओटीवर दिले त्यांचे बील १ कोटी येत असेल तर महापालिकेची किती रक्कमेची सेव्हींग झाली खुलासा करावा.

कार्य.अभियंता(बीओटी) :बीओटीवर मुख्य रस्तेतील लाईटचे काम दिले इन्टरनल रस्ते त्यात नाही इन्टरनल रस्त्यावरील लाईट हे कांप्रेहेन्सीव्ह देण्यात आले बीओटीवर जेवढे पोल देण्यात आले त्यावरील सर्व मेंन्टनन्सचे काम नाशिकचे श्री. पाटील नावाचे व्यक्ती करतात त्यांनी श्री सोनवणे नावाचे व्यक्तीकडे काम दिले कांप्रेहेन्सीव्ह लाईटचे ६ ठेकेदार आहे

मा.उपमहापौर :बीओटीवरील २५ हजार पोलचे दर १,२,४ महिण्याला मा.आयुक्तांकडे बील सादर होते परंतु ७ वर्षात किती सेव्हींग केली माहिती घ्यावी.

श्री.कृष्णा बनकर :लाईट बंद करून सेव्हींग करतो व पैसे वसुल करतो असे वाटते.

कार्य.अभियंता(बीओटी) :संचिका बघून माहिती देता येईल.

मा.उपमहापौर :सबंधीत एजन्सीला बील दिले जाते सेव्हींग किती होते ,मीटर कोणते बसविले हे माहिती यात मोठा भ्रष्टाचार आहे बीओटीधारक व ६ एजन्सीला काम दिले दोन्ही महापालिकेकडे पैसे वसुल करीत आहे. माझ्या वार्डात बीओटी शिवाय एक ही लाईट दुसरा नाही ७ वर्षात किती सेव्हींग केली

श्री.गिरजाराम हळनोर :कीती सेव्हींग झाली याची आकडेवारीच नाही जे बील आले ते कशाच्या अधारावर देण्यात आले.

मा.उपमहापौर :आजही महापालिकेला १० टक्के मीटर एव्हरेज बील दिले जाते.याची विचारणा जीटीएल कडे कुणी केली नाही महापालिकेच्या लाईट कनेक्शनवर शहरात रसवंती , होर्डींग ओपनस्पेस मध्ये जे लग्न समारंभ होतात तेथे लाईट वापरली जाते तसेच कामगारांचे घरकूल मध्ये कनेक्शन दिले तेथून ते कर्मचारी लाईट विकतात.कोणीही अधिकारी यांनी चौकशी केली नाही. माझ्या वार्डात अंहिसानगर भागात गणपती उत्सवाच्या काळात लाईट बंद केले होते मी विनंती केल्यानुसार लाईट चालू केले १.२० लक्ष बील बाकी तपासणी केली असता ते मीटर चिकलठाणा येथील होते येथील मीटर दुसरीकडे लावण्यात आले असावे असा प्रकार या विभागात चालतो २५ हजार पोलचे सेव्हींग किती होते .मीटर रिडींग चुकीचे आहे आजही रॅमकीकडून लाईट बील घेतले जात नाही.महापालिकेच्या इमारतीतील बॅकेकडे लाखो रूपयाचे बील थकीत आहे ते वसुल केले जात नाही आतापर्यंत सहा एजन्सीला दिलेली बीले व २५ हजार पोल बीओटीवर लावण्यात आले या बाबतची मुख्यलेखा परीक्षक यांचे कडे चौकशी करण्यासाठी देण्यात यावे.

मा.आयुक्त :लाईटच्या संदर्भात मागिल बैठकीत काही अधिका-यांना आपण दंडात्मक कार्यवाही केली होती आणि सततच हा लाईटचा विषय अधांरच चालला होता.बरेचशे मुद्दे या संदर्भात झाले या बाबत मुख्यलेखा परीक्षक व त्यांचे सोबतीला दोन अधिकारी देवून या संपूर्ण लाईट सिस्टीमची तपासणी करण्याचे आदेशीत करण्यात येते. याच बरोबर जी मागिल सिस्टीम आहे ती मोडीत काढून नव्याने जे काही करायचे होते त्या संदर्भातही जे काम करायचे होते ते तातडीने करावे जेणे करून १ एप्रिलपासून नवीन काही सिस्टीम करता आली पाहिजे अशी कार्यवाही करावी मुख्यलेखा परीक्षक व आणखी ०२ अधिकारी चौकशी करण्यासाठी मदतीला देण्यात येतील.

जीटीएल कंपनीकडून काम करून घेणे बाबतचा विषय समोर आला सर्व रस्त्यावरील काम पावसाळा अगोदर करायचे आहे लाईट शिप्टीचा मोठा प्रश्न आहे.१४ रस्ते होत आहे १६ रस्ते आणखी करणार २२ रस्त्यावरील काम जीटीएल कडून करून घेणे आहे. या कंपनीचे वरिष्ठ अधिकारी यांना ७ पत्र दिले मा.खासदार , जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली बैठका झाल्या त्यात या बाबत चर्चा झाली ताबडतोबीने

जीटीएलने काम करावे असे आदेशीत झाले परंतु जीटीएल काम करण्यास तयार नाही.त्यांनी १२.६० कोटीचे इस्टीमेट दिले .लाईटचे काम झाल्याशिवाय रस्त्याचे काम करता येत नाही.एलबीटीचे जवळपास वर्षभरातील १० कोटीचे बील होते ते घेवू असाही दबाव आणण्याचा प्रयत्न केला शासनाकडे प्रस्ताव पाठविला २ टक्के प्रमाणे एलबीटी लागू करण्याचा प्रस्ताव मंजूरही केला १ जुलै २०११ पासून त्यांनी एलबीटी भरावा त्यांनी नोंदणी करावी नसता गुन्हे दाखल करू अशाही कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला .हे काम जीटीएलने करावे जे काही करायचे ते ठरवले पाहिजे. निर्णय अंतिम घेतला पाहिजे.स.पदाधिकारी यांनी एक समिती किंवा स.पदाधिकारी यांची समिती करून या २-३ दिवसामध्ये सर्वसाधारण सभेची वाट न बघता योग्य तो महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने जे महापालिकेचा खर्च होणार नाही लाईटची कामे झाली पाहिजे योग्य निर्णय घ्यावा जेणे करून रस्त्याची कामे थांबणार नाही.शासनाच्या स्तरावर उशीराने वेगळे निर्णय होवू शकतात काम थांबणार नाही पावसाळयाच्या अगोदर ही कामे करायची आहे.या दृष्टीने निर्णय घ्यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :आताच म्हटले की जीटीएल कंपनीच्या बाबत निर्णय घ्यावा.जीटीएल ही खाजगी कंपनी आहे.एमएसईबीच्या विरोधात २००१ मध्ये मा.महापौर यांचे नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी नगरसेवक यांनी अंदोलन धरणे उपोषण केले लोकप्रतिनिधीचा दबाव आणून आजपर्यत विद्युत पुरवठा खंडीत झालेला नाही.त्याप्रमाणे आता जीटीएल च्या संदर्भात उपोषण करण्याची वेळ आली काम करावे नसता एलबीटी भरावा असे सुचवावे जर महापालीकेच्या कार्यक्षेत्रात ही संस्था पैसे कमवित असेल तर त्यास चार्जेस लावण्याचे अधिकार महापालिकेला आहे तसा निर्णय विधी मंडळात व मा. उच्च न्यायालय नागपूर येथे सुध्दा झाला ही जबाबदारी त्या संस्थेची असे म्हटले पाहिजे विनामुल्य काम करून देण्याची आपण सर्वांनी मागणी करावी.जीटीएलला पैसे भरले तर नेहमीच मागणी करतील विनाकारण मनपाला तो भुर्दड होईल त्यासाठी विनामुल्य सर्व रस्त्यातील लाईटची जीटीएल कडून कामे करून देण्याची मागणी करावी.

मा.महापौर :शहरातील जे लाईट बंद आहे ते दोन दिवसात सुरू करण्यात यावे व दोन दिवसात अहवाल माझ्याकडे सादर करण्यात यावा.

श्री.खाजा शरफोद्दीन :माझ्या वार्डात पाण्याची समस्या आहे २ वर्षापूर्वी एका कामाचे टेंडर झाले तो भाग दलीत आहे स्लम आहे ४० वर्षापासूनची वसाहत असून हमालवाडा भागाला रस्ता जोडलेला आहे सदर काम का केले नाही विचारणा केली असता मा.आयुक्तानी पाण्याची पुर्ण कामे रद्द केली असे उत्तर मिळाले पाण्याचा गंभीर विषय आहे असे कामे थांबवून ठेवता येते का त्या भागात सध्या पाण्याची मोठी टंचाई आहे तातडीने काम करण्याचे आदेशीत करावे

श्रीमती सविता सुरे :माझ्या वार्डातील ओपनस्पेस च्या जागेवर होत असलेले बांधकाम बाबत खूलासा करावा.

उप-अभियंता.(न.र) :हर्सुल जागेच्या प्रकरणा संदर्भात २ दिवसाच्या आत संबधीत स.सदस्य यांना माहिती दिली जाईल संबधीत अधिकारी हे मा.न्यायालयात एका कामासाठी थांबलेले आहे.

श्री.गिरजाराम हळनोर :पुढील बैठकीच्या अगोदर याचा अहवाल दयावा आता स्थगिती दिली परंतु परवानगी कशी दिली माहिती दयावी स.पदाधिकारी यांनाही माहिती दयावी पाणी पुरवठयाची नवीन कामे करणार की नाही सर्व समांतर जलवाहिनीच्या माध्यमातून करणार खुलासा करावा.

श्रीमती वाणी सावित्रीबाई:मिटमिटा पडेगाव भागात पाण्याची मोठी टंचाई आहे वार्डातील टॅकरचे लोक पैसे भरतात पाणी येत नाही तर पैसे कसे देणार त्याना ते परत करावे पाणी देण्यात यावे.

डॉ.जफर खॉन :जिल्हा परीषदेच्या अध्यक्षपदी श्रीमती नाहिदाबानो पठाण व उपाघ्यक्षपदी श्रीमती विजयाताई चिकटगावकर यांनी नियुक्ती झाली त्यांचे अभिनंदन करावे.

मा.महापौर :आताच सुचवल्यानुसार जिल्हा परीषदेच्या नवीन अध्यक्ष श्रीमती नाहिदाबानो पठाण व उपाघ्यक्षपदी श्रीमती विजयाताई चिकटगांवकर यांची निवड झाल्याबध्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.गिरजाराम हळनोर :उन्हाळयाचे दिवस असल्याने पाण्याची टंचाई भासणार आहे मध्यतरी ७०० ची लाईन बंद होती काही एमएसईबीचे काम होते म्हणून पाणीपुरवठा बंद होता आता पाणी टंचाई निर्माण होवू शकते मागिल वर्षी उन्हाळयाच्या दिवसात टीम तयार केली होती त्यात कार्य.अभियंता ,उपअभियंता,दुय्यम अवेक्षक होते त्यात फारोळा ते स्टेशनपर्यंतचे लाईनचे ही अधिकारी होते ही टीम परत कार्यरत करण्यात यावी.

मा.महापौर :प्रशासनास आदेशीत करण्यात येते की मागिल वर्षी मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे यांचे नेतृत्वाखाली एक बैठक घेतली त्या बैठकीमध्ये जी यंत्रणा राबविण्या बाबत कार्यवाही केली होती ती यंत्रणा पुन्हा या उन्हाळयात राबविण्यात यावी व पाणीप्रश्न सोडविण्यात यावा.

श्रीमती प्रिती तोतला :माझ्या वार्डात पाणी प्रश्न संबधीत अधिकारी यांनी सोडविला आहे त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करते तसेच वसंतभुवन भागात २-३ दारूचे दुकान आहे महिला त्या रस्त्याने पाणी भरण्यासाठी जा-ये करावी लागते या बाबतीत कार्यवाही करावी.

**विषय क्र :-६४६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.४३,४६ व ४४ रोशनगेट ते आझाद चौक पर्यंत १००,१५० व २५० मि.मि. व्यासाची डी.आय.के.७ जलवाहीनी टाकणेचे प्रस्तावित आहे.

वार्ड क्र.४३, ४६ व ४४ मध्ये १००,१५० व २५० मि.मि. व्यासाची जलवाहीनी असुन, रोषणगेट ते आझाद चौक पर्यंत रस्ता रूंदीकरणाचे काम सुरू असून, रस्त्याच्या कामामध्ये बाधीत झालेल्या आहेत. त्यामुळे जलवाहिन्या वारंवार फुटत असून, नळ कनेक्शन बऱ्याच प्रमाणात तुटलेले आहे. करीता रोषणगेट ते आझाद चौकापर्यंत रस्त्याला लागुन उत्तर बाजुस

नवीन १००,१५० व २५० मि.मी. व्यासाच्या डी.आय.जलवाहिन्या टाकणे आवश्यक आहे. या कामाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागाच्या सन २०११-१२च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये ३०,२९,८००/- चे तयार करण्यात आले आहे. या कामावर होणार खर्च भांडवली कामे पाणी पुरवठा (वार्ड क) या लेखा तरतुदीमधुन करण्यात येईल.

करीता वार्ड क्र.४३,४६ व ४४ रोशनगेट ते आझाद चौक पर्यंत १००,१५० व २५० मि.मि. व्यासाची डी.आय.के.७ जलवाहीनी टाकणेचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ३०,२९,८००/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :-**

नगर सचिव :या विषया संदर्भात मा.आयुक्त महापालिका औरंगाबाद यांचेकडून सभागृहासाठी पत्र प्राप्त झाले आहे.(प्रस्ताव मागे घेणे बाबत पत्र वाचून दाखवितात)

श्री.खाजा शरफोद्यीन :माझ्या वार्डातील पाणीपुरवठयाचा विषय होता काम रद्य केले असे समजले खुलासा घ्यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :मा.आयुक्तांनी प्रस्ताव मागे घेणे बाबत पत्र दिले त्यांचा उद्देश चांगला आहे सर्व पाणीपुरवठा लाईन योजनेच्या मध्ये समावेश केल्या आहे. समांतरचा विषय आला त्यावेळी चर्चा होवू दिली नाही गोधळात प्रस्ताव मंजूर केला जी कामे महत्वाची व करणे आवश्यक आहे ती होणार की नाही समांतरचे योजनेतून कामे होणार तोपर्यंत अशी कामे करणार नाही.का समांतरचे काम केंव्हा सुरू होणार कोणी खात्रीशीर सांगू शकते का ?जे जे आवश्यक वाटेल ते इंटरनल काम सर्व करणार होते परंतु सर्व कामे त्यात टाकली यापूर्वी ही चुकीच्या निर्णयामूळे पुंडलीकनगर वासीयांना पाणी मिळत नाही. जे आवश्यक कामे आहे ती करावी लागणार आहे. ३ वर्ष समांतर जलवाहीनी झाली नाही तर कामे थांबविणार का १.६६ लक्षचे काम सुध्दा मंजूर होत नाही. पाणी पुरवठयाची कामे व्हावीत नियोजन करावे झालेला खर्च योजनेकडून वसूल करावे.पाणी पुरवठयाची कामे व्हावी असे माझे मत आहे.

डॉ.जफर खॉन :संमातरचे काम होईल वेळ लागणार आहे परंतु जी पाणीपुरवठयाची आवश्यक कामे आहे ती करावी खर्च काढून घेण्यात यावा.

श्रीमती सावित्रीबाई वाणी:माझ्या वार्डात पाणीपुरवठयाचा प्रस्ताव मंजूर झाला काम केले नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :सिडको हडको भागात ६ दिवसापासून कमी दाबाने पाणी येते १.६६ लक्षचे काम करायचे तेही होत नाही त्यामूळे पाणी कमी येते.

कार्य.अभियंता (पापू) :आताच स.सदस्यांनी म्हटले की पाणी पुरवठयाची कामे करावी व समांतर जलवाहिनीच्या खर्चातून तो खर्च काढून घ्यावा परंतु कन्सेसन ॲग्रीमेन्ट झालेले आहे त्यामध्ये अशा कुठल्याही प्रकारची तरतूद नाही विनाकारण कामात अडथळा येईल व काम बंद होईल १ ते दीड महिणा लागेल समांतरची कामे सुरू होणार आहे.३ वर्षात कामे करणार आहे जस जशी गरज पडेल तशी कामे होतील जवळपास १३०० कि.मी. डिस्ट्रीब्युश्न लाईन झालेल्या आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :३५ कोटीचा अर्थसंकल्प ५०० कोटीवर गेला तरी कशा पध्दतीने कामे होतात याची कल्पना आपल्याला येईल. तात्रिंक दृष्टया किती ठिकाणी लाईन टाकणार आहे कशा टाकणार कोणत्या लाईनवरून सप्लाय घेणार याची कल्पना आम्हाला दिली नाही.पारदर्शकपणे काम व्हावे.

कार्य.अभियंता(पापू) :७९२ च्या अंदाजपत्रकातून १३०० कि.मी. डिस्ट्रीब्युशन लाईन टाकल्या कोणत्या भागात टाकल्या हे आताच माहिती नाही १ ते दीड महिण्यात काम सुरू होईल

मा.उपमहापौर :४० कोटीचे काम चितेगाव वगैरे भागात चालू आहे.

कार्य.अभियंता (पापू ) :४० कोटीचे काम हे ७९२ कोटीच्या मध्ये नाही.४० कोटीमध्ये शासन २८ कोटी देणार आहे.

श्री.गिरजाराम हळनोर :जी कामे करणे आवश्यक आहे ती समांतरचे काम सुरू झाल्यास त्यांना प्राधान्याने घ्यावेत.

मा.उपमहापौर : जी आता पाणी पुरवठयाची कामे करणे आवश्यक आहे ती प्रोसेस मध्ये ठेवावी समातंरचे काम लवकर सुरू झाले नाही तर ही कामे करण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :पाण्याची कामे हाती घेणार नाही जाहिर करावे.

कार्य.अभियंता(पापू) :कीरकोळ कामे असेल तर करता येतील.

मा.महापौर :सदरील प्रस्ताव मागे घेण्यात यावा म्हणून संबंधीत कार्यकारी अभियंता यांचे पत्र प्राप्त झाले आहे.त्या नुसार सदर प्रस्ताव संबधीत विभागास परत पाठविण्यात येत आहे.

**ठराव :-**

प्रस्तुत प्रस्ताव संबधीत विभागाकडे परत पाठविण्यास मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र :-६४७**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करित आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेचा वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील स्थायी व अस्थायी कर्मचा-यांनी सन २०१०-११ या आर्थिक वर्षातील दिवाळी सणा निमित्ताने सण अग्रिम,दिवाळी भेट ,सानुग्रह अनुदान अदा करणे बाबत मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली मा. महापौर यांच्या दालनातील सर्व स. पदाधिकारी यांच्या समवेत झालेली बैठक दि. १९/१०/२०११ च्या निर्णयानुसार तसेच मा.महापौर व अध्यक्ष कामगार शक्ती संघटना यांची संयुक्त बैठक दि. २५/१०/२०११ च्या निर्णयानुसार दिवाळी सणा निमित्ताने देण्यात आलेले सण अग्रिम, दिवाळी भेट ,सानुग्रह अनुदान खालील प्रमाणे

१) महानगरपालिकेतील वर्ग ४ संवर्गातील ज्या स्थायी व अस्थायी कर्मचा-यांनी सन २०१०-११ या आर्थिक वर्षात किमान ६ महिने सलग सेवा केलेली असेल असे कर्मचा-यास सेवा कालावधीनुसार दिलेले रू.२०००/- नुसार सानुग्रह अनुदान खालील प्रमाणे:

| **अस्थापना** | **एकुण कर्मचारी** | **रक्कम** | **देण्यात एकुण आलेली रक्कम रू.** |
|---|---|---|---|
| स्थायी/अस्थायी कर्मचारी | २७४६ | २००० | ५४,७३,१६८.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| शिक्षण विभाग<br>शिक्षण विभाग | १०८ | २००० | २,१६,०००.०० |
| | | एकुण | ५६,८९,१६८.०० |

२) महानगरपालिकेतील सर्व स्थायी व अस्थायी वर्ग-३ सवंर्गातील कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार व मा.महापौर यांचे बैठकीतील निर्णयानुसार प्रत्येकी रू.२५००/- सण अग्रिम देण्यात असुन त्याची वसुली १० समान हप्त्यात करण्यात येईल.

| **अस्थापना** | **एकुण कर्मचारी** | **रक्कम** | **देण्यात एकुण आलेली रक्कम रू.** |
|---|---|---|---|
| स्थायी/अस्थायी कर्मचारी शिक्षण विभाग<br>शिक्षण विभाग | ४८४<br>२७४ | २५००<br>२५०० | १२,१०,०००.००<br>६,८५,०००.०० |
| | | एकुण | १८,९५,०००.०० |

३) महानगरपालिकेतील बचत गटामार्फत काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रू.२०००/- दिवाळी सणानिमित्त दिवाळी भेट म्हणुन मंजुरी देण्यात आलेली आहे.

| बचतगट कर्मचारी | एकुण कर्मचारी | रक्कम | देण्यात एकुण आलेली रक्कम रू. |
|---|---|---|---|
| बचतगट कर्मचारी | ३१५ | २००० | ६,०२,०००.०० |
| | | एकुण | ६,०२,०००.०० |

४) महानगरपालिकेतील शिक्षण विभागातील बालवाडी कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रू.१०००/- दिवाळी सणानिमित्त दिवाळी भेट म्हणुन मंजुरी देण्यात आलेली आहे.

| बालवाडी कर्मचारी | एकुण कर्मचारी | रक्कम | देण्यात एकुण आलेली रक्कम रू. |
|---|---|---|---|
| बालवाडी कर्मचारी | १५३ | १००० | १,५३,०००.०० |
| | | एकुण | १,५३,०००.०० |

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करीता महानगरपालिकेच्या वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील स्थायी व अस्थायी कर्मचाऱ्यांना तसेच बचत गटामार्फत काम करणा-या कर्मचा-यांना व शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांना सन २०१०-११ या आर्थिक वर्षातील दिवाळी सणा निमित्ताने सण अग्रिम, दिवाळी भेट, सानुग्रह अनुदान म्हणुन देण्यात आलेली एकुण रक्कम रू.८३,३९,१६८/- या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**संवाद :-**

श्री.गिरजाराम हळनोर :यात कामगार शक्ती संघटनेचे अध्यक्ष हजर होते असे म्हटले इतर संघटनेचे पदाधिकारी होते असे यात नमूद करावे

मा.महापौर :दिनांक २५-१०-२०११ रोजीच्या बैठकीत इतर कामगार संघटनेचे पदाधिकारी हजर होते, हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रमांक ०१ ते ०४ मध्ये नमुद केल्यानुसार महानगरपालिकेच्या वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील स्थायी व अस्थायी कर्मचाऱ्यांना तसेच बचत गटामार्फत काम करणा-या कर्मचा-यांना व शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांना सन २०१०-११ या आर्थिक वर्षातील दिवाळी सणा निमित्ताने सण अग्रिम, दिवाळी भेट, सानुग्रह अनुदान म्हणुन देण्यात आलेली एकुण रक्कम रू.८३,३९,१६८/- या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४८,**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्रमांक १८ मध्ये अर्थसंकल्प सन २०११-१२ मध्ये नविन कामाचे लेखाशिर्ष बदलणे बाबत..

| अ.क्र | जुन्या कामाचे लेखाशिर्ष | नविन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.१८ पवननगर येथे हायमास्ट बसविणे. रक्कम रू.५ लक्ष<br>GBR Ward-B, Page ३ | १.वार्ड क्र.१८ विविध ठिकाणी उर्जा बचत दिवे बसविणे २.०० लक्ष<br>२. वार्ड क्र.१८ विविध ठिकाणी इंधन विहिर करणे व हातपंप बसविणे १.०० लक्ष<br>३. वार्ड क्र.१८ पवननगर येथे विहिर वरून GI लाईन टाकणे १.०० लक्ष<br>४. वार्ड क्र.१८ संत ज्ञानेश्वर नगर येथे DI Pipe, नविन जलवाहीनी टाकणे १.०० लक्ष. |

सुचकः- सौ.उर्मिला नितीन चित्ते अनुमोदकः-सौ.कमल रामचंद्र नरोटे

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे , वार्ड क्रमांक १८ मध्ये अर्थसंकल्प सन २०११-१२ मध्ये खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते

| अ.क्र | जुन्या कामाचे लेखाशिर्ष | नविन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.१८ पवननगर येथे हायमास्ट बसविणे. रक्कम रू.५ लक्ष<br>GBR Ward-B, Page ३ | १.वार्ड क्र.१८ विविध ठिकाणी उर्जा बचत दिवे बसविणे २.०० लक्ष<br>२. वार्ड क्र.१८ विविध ठिकाणी इंधन विहिर करणे व हातपंप बसविणे १.०० लक्ष<br>३. वार्ड क्र.१८ पवननगर येथे विहिर वरून GI लाईन टाकणे १.०० लक्ष<br>४. वार्ड क्र.१८ संत ज्ञानेश्वर नगर येथे DI Pipe, नविन जलवाहीनी टाकणे १.०० लक्ष. |

वैधनिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र.:- ६४९**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०६ बेगमपुरा येथील प्रसिध्द थत्ते हौद आहे. या हौदातुन दररोज साधारणत: ४ ते ५ टँकर पाणी वाहुन जाते. सदरील पाणी हे पुर्वी पिण्यायोग्य होते, पाणी वाहुन जाण्यापेक्षा जवळच असलेल्या रूणवाल रेसीडेन्सी येथील रहिवाश्यांना पुरेसे पाणी मिळत नसल्यामुळे सदरील पाणी वापरासाठी महानगरपालिकेतर्फे विद्युत मोटर बसवुन पाणी पुरवठा करण्याबाबत मागणी करीत आहेत. करीता नागरीकांची मागणी लक्षात घेता व सदरील वाहुन जाणाऱ्या पाण्याचा उपयोग नागरीकांसाठी होत असल्याने नागरीकांसाठी थत्ते हौदातील पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक:-श्री.ज्ञानोबा पाडुरंग जाधव, श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक :-श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.०६ बेगमपुरा येथील प्रसिध्द थत्ते हौदातील पाणी जवळच असलेल्या रूणवाल रेसीडेन्सी येथील रहिवाश्यांना पुरेसे पाणी मिळण्यासाठी महानगरपालिकेतर्फे विद्युत मोटर बसवुन नागरीकांसाठी थत्ते हौदातील पाणीपुरवठा करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र :- ६५०**

वार्ड क्र.७८ चिकलठाणा मध्ये चिकलठाणा गावालगत व विमानतळ जवळील परिसरात जुनी गुंठेवारी वसाहत आहे. या भागातील घरे एक जानेवारी २००१ पूर्वीची आहेत. परंतू विमानतळ परिसरालगत असल्याने व नाविकास क्षेत्रात असल्याने या ठिकाणी अनेक गुंठेवारी धारकांनी गुंठेवारी शुल्क जमा करूनही गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात येत नाही. परंतु याच भागामध्ये महानगरपालिकेने आरोग्य केंद्र इत्यादी बांधकाम केले आहे.

करीता या भागातील एक जानेवारी २००१ पुर्वी अस्तिवात असलेल्या घरांना एक मजल्याच्या मर्यादेत गुंठेवारी विकास नियमीत करणेस मान्यता देण्यात यावी .प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :-श्री.रवि साहेबराव कावडे अनुमोदक :- श्री.राजू शिंदे ,श्री.समीर राजुरकर

डॉ.खान जफर अहमद : हर्सुल गट नं.२९९ चा हयात समावेश करावा.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजुर .

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७८ चिकलठाणा मध्ये चिकलठाणा गावालगत व विमानतळ जवळील परिसरातील व हर्सुल गट नं.२९९ भागातील एक जानेवारी २००१ पुर्वी अस्तिवात असलेल्या घरांना आणि चिकलठाणा येथील घरांना एक मजल्याच्या मर्यादेत गुंठेवारी विकास नियमीत करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र :-६५१**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.८४ येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असून खालील कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवून काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| वार्ड क्र. ८४ अंतर्गत पेव्हर | १) वार्ड क्र.८४ अंतर्गत नाथ प्रागंण परिसरातील |

| | |
|---|---|
| बसविणे अर्थसंकल्प पान क्र. GBR WARD-E-PAGE ३ वर १० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | आर.बी.हिल्स् ऐमरॉल्ड सिटी,साहस सोसायटी,रान वाटा,डेक्कन संस्कृति,मयुरटेरेस ,सारा राज नगर, भागात पथ दिव्या करिता नविन जि.आय पोल,फिटिंग केबलची विद्दुत व्यवस्था करणे -४ लक्ष रूपये.<br>२) वार्ड क्र. ८४ अंतर्गत पहाडे कॉर्नर ,कल्पतरू सोसायटी,शिवनेरी कॉलनी ,माणकनगर,नंदनी नगर आदर्श कॉलनी ,जय दुर्गा सोसायटी, बाळकृष्ण नगर भागात पथदिव्या करिता नविन जि आय पोल फिंटिग व केबल ची विद्दुत व्यवस्था करणे - ४ लक्ष रूपये<br>३) वार्ड क्र.८४ अंतर्गत विविध जागी विद्दुत व्यवस्थासाठी फिटिंग लावणे ,केबल बसविणे जंकशन बॉक्स व देखभाल दुरूस्ती करणे - २ लक्ष रूपये . |

सुचक :- श्री. पंकज रामचंद्र भारसाखळे अनुमोदक :- श्रीमती. कला रविनंदन ओझा

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ,वार्ड क्र.८४ येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावीत विकास कामाची तरतुद खालील सुधारीत कामासाठी ठेवण्यास व कामा हाती घेण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| वार्ड क्र. ८४ अंतर्गत पेव्हर बसविणे अर्थसंकल्प पान क्र. GBR WARD-E-PAGE ३ वर १० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | १) वार्ड क्र.८४ अंतर्गत नाथ प्रागंण परिसरातील आर.बी.हिल्स् ऐमरॉल्ड सिटी,साहस सोसायटी,रान वाटा,डेक्कन संस्कृति,मयुर टेरेस ,सारा राज नगर,भागात पथ दिव्या करिता नविन जि.आय पोल,फिटिंग केबलची विद्दुत व्यवस्था करणे -४ लक्ष रूपये.<br>२) वार्ड क्र. ८४ अंतर्गत पहाडे कॉर्नर ,कल्पतरू सोसायटी,शिवनेरी कॉलनी ,माणकनगर,नंदनी नगर आदर्श कॉलनी ,जय दुर्गा सोसायटी, बाळकृष्ण नगर भागात पथदिव्या करिता नविन जि आय पोल फिंटिग व केबल ची विद्दुत व्यवस्था करणे - ४ लक्ष रूपये<br>३) वार्ड क्र.८४ अंतर्गत विविध जागी विद्दुत व्यवस्थासाठी फिटिंग लावणे ,केबल बसविणे जंकशन बॉक्स व देखभाल दुरूस्ती करणे - २ लक्ष रूपये . |

वैधानिक कार्यवाही व्हावी .

**<u>विषय क्र :-६५२</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,औरंगाबाद महानगरपालिका मनपा अर्थसंकल्प २०११-२०१२,वार्ड क्रं.४७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावा,म्हणुन प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्रं. व अ.क्र. | २०११-२०१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| GBR B-१ S NO-०७ | शहरी भागातील पुनःडांबरीकरण वार्ड क्रं.४७ अंतर्गत विविध ठिकाणी पुर्नःडांबरीकरण करणे.आर्थीक तरतुद १३ लक्ष | १. वार्ड क्रं.४७ अंतर्गत रस्त्यांचे कॉक्रेटींग करणे. |
| GBR B - ५<br>S NO - ०२ | वार्ड क्रं.४७ अंतर्गत पाणी पुरवठयाची कामे करणे.आर्थीक तरतुद ०९ लक्ष . | १. वार्ड क्रं. ४७ अंतर्गत रस्त्यांचे कॉक्रेटींग करणे . |

सुचक :- श्री.हुशारसिंग चव्हाण अनुमोदक :- श्री. दिग्वीजय शेरखाने

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका मनपा अर्थसंकल्प २०११-२०१२, वार्ड क्रं.४७ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रं. व अ.क्र. | २०११-२०१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| GBR B-१ S NO-०७ | शहरी भागातील पुनःडांबरीकरण वार्ड क्रं.४७ अंतर्गत विविध ठिकाणी पुर्नःडांबरीकरण करणे.आर्थीक तरतुद १३ लक्ष | २. वार्ड क्रं.४७ अंतर्गत रस्त्यांचे कॉक्रेटींग करणे. |
| GBR B - ५<br>S NO - ०२ | वार्ड क्रं.४७ अंतर्गत पाणी पुरवठयाची कामे करणे.आर्थीक तरतुद ०९ लक्ष . | २. वार्ड क्रं. ४७ अंतर्गत रस्त्यांचे कॉक्रेटींग करणे . |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र :-६५३</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्रं.९७ मध्ये सादातनगर भागात मुस्लीम कब्रस्तान व दलित स्मशान भुमीसाठी महानगरपालिकेने ४ एकर २० गुंठे जमीन संपादित केलेली असुन या भागात मुस्लीम बांधवाना दफन विधी करण्यासाठी अंदाजे ४ ते ५ किलोमिटर जावे लागते. सदरील जमीन मनपाने संपादित करुनही अनेक वर्ष झालेली आहेत संपादित जागेतुन २ एकर २० गुंठेमध्ये मुस्लीम समाजासाठी दफन विधी करण्यासाठी देण्यांत यावी.

करिता या कब्रस्थानात दफनविधी सुरू करण्यासाठी मान्यता देण्यांत यावी. म्हणुन प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचकः- सौ.आशाताई राजेश मोरे अनुमोदकः-सौ.रेणुका कृष्णा वाडेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रं.९७ मध्ये सादातनगर भागात मुस्लीम कब्रस्तान व दलित स्मशान भुमीसाठी महानगरपालिकेने ४ एकर २० गुंठे संपादित जमीनीतुन २ एकर २० गुंठेमध्ये मुस्लीम समाजासाठी दफन विधी करण्यासाठी नियमानुसार देण्यास व कब्रस्तानात दफनविधी सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र :- ६५४**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६४, क्रांती चौक मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प | कामाचे नांव | सुधारित कामाचे नाव |
|---|---|---|
| पान क्रं. मा.महापौर निधी | संत एकनाथ रंग मंदिर येथे डि.पी.रस्त्यात बाधीत होणारी संरक्षित भिंत तोडुन नविन भिंत बांधणे. ५ लक्ष | झांबड इस्टेट येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे. ५ लक्ष |

सुचक:-श्री.रेणुकादास (राजु) वैद्य अनुमोदक:-श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६४, क्रांती चौक मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अर्थसंकल्प | कामाचे नांव | सुधारित कामाचे नाव |
|---|---|---|
| पान क्रं. मा.महापौर निधी | संत एकनाथ रंग मंदिर येथे डि.पी.रस्त्यात बाधीत होणारी संरक्षित भिंत तोडुन नविन भिंत बांधणे. ५ लक्ष | झांबड इस्टेट येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे. ५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र :- ६५५**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८ पडेगांव अंतर्गत मुख्य रस्त्यास लागुन असलेल्या चौकास नाव देण्याची मागणी स्थानिक नागरीक वारंवार करीत आहे. करीता खालील प्रमाणे चौकास नावे देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

| अ.क्र | चौक | चौकाचे प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | पडेगाव (शनिमंदिर समोर) | अहिल्याबाई होळकर चौक |
| २ | मिटमिटा (मनपा शाळेसमोर) | छत्रपती शिवाजी महाराज चौक |

सुचक:-सौ.सावित्रीबाई हिरालाल वाणी अनुमोदक:-श्री.बन्सी ग्यानु जाधव,श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८ पडेगांव अंतर्गत मुख्य रस्त्यास लागुन असलेल्या चौकास खालील प्रस्तावीत प्रमाणे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | चौक | चौकाचे प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | पडेगाव (शनिमंदिर समोर) | अहिल्याबाई होळकर चौक |
| २ | मिटमिटा (मनपा शाळेसमोर) | छत्रपती शिवाजी महाराज चौक |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र :- ६५६**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८ पडेगांव अंतर्गत मुख्य रस्त्यास लागुन असलेल्या चौकास नाव देण्याची मागणी स्थानिक नागरीक वारंवार करीत आहे. करीता खालील प्रमाणे चौकास नावे देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | चौक | चौकाचे प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | चिनार गार्डन रोड | छत्रपती संभाजी राजे चौक |
| २ | पडेगांव (गावठाण) | छत्रपती शिवाजी महाराज चौक |

सुचक:-सौ.सावित्री हिरालाल वाणी अनुमोदक:-श्री.बन्सी ग्यानु जाधव,श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८ पडेगांव अंतर्गत मुख्य रस्त्यास लागुन असलेल्या प्रस्तावातील खालील चौकास नांव देण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | चौक | चौकाचे प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | चिनार गार्डन रोड | छत्रपती संभाजी राजे चौक |
| २ | पडेगांव (गावठाण) | छत्रपती शिवाजी महाराज चौक |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र:-६५७**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२८, नेहरूनगर मधील नेहरूनगर, एस.टी.कॉलनी, खाजा कॉलनी, सदफ कॉलनी भागात सुमारे सहा वर्षापासुन पाण्याचा त्रास होत आहे. मनपा तर्फे हत्तेसींगपुरा येथे जलकुंभ देखील बांधण्यात आले. परंतु या जलकुंभात कधीच योग्य पातळीवर पाणी साठत नसल्याने नागरीकांना पाणी पुरवठा होऊच शकत नाही. ही बाब पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता यांना देखील माहिती आहे. परंतु मुख्य जलवाहिनीवरील अनाधिकृत नळ जोडण्या आणि अनियमित पंपीगमुळे या भागातील नागरीकांना पाच पाच दिवस पाण्यासाठी वाट पहावी लागते, या भागातील पाण्याची समस्या दुर करण्यासाठी त्वरीत कार्यवाही होणे आवश्यक आहे. करीता नेहरूनगर वार्डातील वरील वसाहतींच्या पाणी पुरवठयाकरीता, हत्तेसींगपुरा येथील जलकुंभाजवळ sump तयार करण्याकरीता आवश्यक आर्थिक तरतुद करण्यासाठी किंवा योग्य कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर करण्यात येत आहे.

सुचक:-श्री.जँहागीर खान अब्बास खान अनुमोदक:-श्री.मुजीबखान मिर आलम खान

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२८, नेहरूनगर मधील नेहरूनगर, एस.टी.कॉलनी, खाजा कॉलनी, सदफ कॉलनी भागात पाणी पुरवठयाकरीता, हत्तेसींगपुरा येथील जलकुंभाजवळ sump तयार करण्याकरीता आवश्यक आर्थिक तरतुद व योग्य कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र:-६५८**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२८ नेहरूनगर येथे सन १९९६ मध्ये २२ खाटांचे आरोग्य केंद्र बांधण्यात आले आहे. आरोग्य केंद्राच्या उभारण्यीच्या वेळेस आजुबाजुची वसाहती आणि त्यांची आर्थीक परिस्थिती ध्यानी घेऊन गरीब जनतेला सुविधा प्राप्त व्हाव्यात

म्हणुन इमारतीची उभारणी केली. मोठी इमारत असतांना देखील २२ खांटांचे रूगणालय चालु करण्याकरीता अद्याप कोणतीही कार्यवाही केली गेली नाही. सध्या या इमारतीच्या आजुबाजु प्रचंड घाण असुन येथील दरवाजे, खिडक्या, तावदाने तुटलेल्या अवस्थेत आहे. तसेच सध्या या ठिकाणी अपुऱ्या कर्मचाऱ्यांमार्फत O.P.D (ओ.पी.डी.) ची सुविधा देण्यात येत आहे.

या दवाखान्याच्या जवळच घोषीत स्लम असुन गरीब आणि कष्टकऱ्यांची वसाहत आहे. या भागातील नागरीकांना सुविधा निर्माण व्हावी या हेतुने येथे २२ खाटांचे रूग्णालय सुरू करणे आवश्यक आहे. तसेच इमारतीच्या देखभाल दुरूस्ती करीता आणि २२ खाटांचे रूग्णालय सुरू करण्याकरीता आवश्यक कर्मचारी, डॉक्टर्स, यंत्र सामुग्री इ. करीता सन २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पात प्राधान्याने आवश्यक आर्थीक तरतुद करण्यात यावी.

करीता सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सुचक:-श्री.जॅहागीर खान अब्बास खान अनुमोदक:-श्री.मुजीबखान मीर आलम खान

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२८ नेहरूनगर येथे सन १९९६ मध्ये २२ खाटांचे आरोग्य केंद्र बांधण्यात आले असुन सध्या या ठिकाणी अपुऱ्या कर्मचाऱ्यांमार्फत O.P.D (ओ.पी.डी.) ची सुविधा देण्यात येते. येथे २२ खाटांचे रूग्णालय सुरू करणे आवश्यक असल्याने तसेच इमारतीच्या देखभाल दुरूस्ती करीता आणि २२ खाटांचे रूग्णालय सुरू करण्याकरीता आवश्यक कर्मचारी, डॉक्टर्स, यंत्र सामुग्री इ. करीता सन २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पात प्राधान्याने आवश्यक आर्थीक तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र:-६५९</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्रम.२८, नेहरूनगर येथे ड्रेनेज चोकप, गटारीवरील लोखंडी जाळया आणि पेव्हर ब्लॉक दुरूस्ती इ.देखभाल दुरूस्तीची कामे पुष्कळ असुन या कामासाठी सध्या कोणत्याही प्रकारची तरतुद नाही. नगरसेवक स्वेच्छानिधी आणि देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी ठेवलेली तरतुद मी निवडुन येण्यापुर्वीच समाप्त झालेली आहे. नविन अर्थसंकल्पातील आर्थिक तरतुद किंवा स्वेच्छा निधीचा वापर सुरू होण्यास बराच अवधी लागणार आहे.

करीता वार्ड क्र.२८, नेहरूनगर येथील देखभाल दुरूस्तीच्या विविध कामासाठी रक्कम रूपये ५,००,०००/- पाच लक्ष रूपयांची विशेष तरतुद करणे आवश्यक आहे.

तरी वार्ड क्र.२८,नेहरूनगर येथील देखभाल दूरुस्तीच्या कामाकरीता पाच लक्ष रू.ची विशेष तरतुद करण्यासाठी आणि कामे त्वरीत सुरू करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक:-श्री.जॅहागीर खान अब्बास खान अनुमोदक:-श्री.मुजीबखान मिर आलम खान

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८, नेहरूनगर येथे ड्रेनेज चोकप, गटारीवरील लोखंडी जाळया आणि पेव्हर ब्लॉक दुरूस्ती इ.देखभाल दुरूस्तीची कामे करण्यासाठी रक्कम रूपये ५,००,०००/- पाच लक्ष रूपयांची विशेष तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.:-६६०**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.२६ गणेश नगर येथील विकास कामासाठी सन २०११-२०१२ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षक इमारत बांधकाम उद्यान अ.क्र. ०६ वार्ड क्र. २६ न्यायालयीन सोसायटी अंतर्गत सभागृह बांधणे जीबीआर-बी.पेज.४ वर रक्कम रू.१० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | वार्ड क्र.२६ अंतर्गत एन ८ सिडको भागात डांबरीकरण करणे रू.१० लक्ष |

सुचक :- सौ.प्राजक्ता मंगेश भाले अनुमोदक :- श्री. विरभद्र गादगे

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.२६ गणेश नगर येथील विकास कामासाठी सन २०११-२०१२ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील प्रस्तावीत कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षक इमारत बांधकाम उद्यान अ.क्र. ०६ वार्ड क्र. २६ न्यायालयीन सोसायटी अंतर्गत सभागृह बांधणे जीबीआर-बी.पेज.४ वर रक्कम रू.१० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | वार्ड क्र.२६ अंतर्गत एन ८ सिडको भागात डांबरीकरण करणे रू.१० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. :-६६१**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,मराठवाडा बुध्दीबळ संघटनेच्या वतीने खुली रॅपिड महापौर चषक बुध्दीबळ स्पर्धेचे आयोजन करण्याचा मानस आहे.या स्पर्धा महापौर चषक म्हणून आयोजित करण्यात याव्यात. सदर स्पर्धा माहे २७ ते २९ एप्रिल २०१२ या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून विविध जिल्हयातुन येणा-या स्पर्धकांना निवास,भोजन व रोख बक्षीसे साठी लागणारा खर्च अंदाजे र.रू.०५.०० लक्ष अपेक्षित आहे.स्पर्धा दरम्यान लागणा-या खर्चास मंजुरी देऊन मराठवाडा बुध्दीबळ संघटनेच्या वतीने महापौर चषक बुध्दीबळ स्पर्धेचे आयोजन करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :- सौ.प्रिती तोतला अनुमोदक :- श्री. गोपाळ कुलकर्णी

मा.महापौर :नियुमानुसार कार्यवाही करावी १ लक्ष पर्यंत मदत करावी.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मराठवाडा बुध्दीबळ संघटनेच्या वतीने खुली रॅपिड महापौर चषक बुध्दीबळ स्पर्धेचे आयोजन करण्याचा मानस आहे.या स्पर्धा महापौर चषक म्हणून आयोजित करण्यास व सदर स्पर्धा दरम्यान लागणा-या खर्चास नियमानुसार १ लक्ष रुपये देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र .६६२ :-</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका मनपा अर्थसंकल्प २०११-२०१२ ,वार्ड क्रं.४५ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावा,म्हणुन प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्रं.व अ.क्र. | २०११-२०१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| WARD-C S NO-०८ | वार्ड क्रं. ४५ येथे विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. आर्थिक तरतुद ०५ लक्ष | १. वार्ड क्रं. ४५ अंतर्गत ड्रेनेजची फुटकाळ रेट लिस्ट व A-१ ची कामे करणे. |
| WARD-C Spil-२३ | वार्ड क्रं.४५ हस्तेसिंगपुरा सईदा मस्जीद जवळ खुली जागा विकसित करणे .आर्थिक तरतुद ०३ लक्ष | १. वार्ड क्रं. ४५ अंतर्गत विविध ठिकाणी एनर्जी सेव्हिंग फिटींग लावणे व किरकोळ देखभाल दुरूस्तीचे कामे करणे. |

सुचक :- श्रीमती. फिरदोस फातेमाखान अनुमोदक :- श्री.डॉ.खान जफर अहेमद,
श्री.शेख अब्दुल असद

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाण, वार्ड क्रमांक ४५ मध्ये अर्थसंकल्प सन २०११-१२ मध्ये खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रं.व अ.क्र. | २०११-२०१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| WARD-C S NO-08 | वार्ड क्रं. ४५ येथे विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. आर्थिक तरतुद ०५ लक्ष | १. वार्ड क्रं. ४५ अंतर्गत ड्रेनेजची फुटकाळ रेट लिस्ट व A-१ ची कामे करणे. |
| WARD-C Spil-23 | वार्ड क्रं.४५ हस्तेसिंगपुरा सईदा मस्जीद जवळ खुली जागा विकसित करणे .आर्थिक तरतुद ०३ लक्ष | १. वार्ड क्रं. ४५ अंतर्गत विविध ठिकाणी एनर्जी सेव्हिंग फिटींग लावणे व किरकोळ देखभाल दुरूस्तीचे कामे करणे. |

वैधनिक कार्यवाही व्हावी .

**<u>विषय क्र.६६३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की प्रभाग क्रं. ७९ मुकंदवाडी मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरणासाठी सन २०११-२०१२ च्या अर्थ संकल्पात जी बी आर ई -१ मध्ये रक्कम रू.१५ लक्ष तरतुद करण्यात आली आहे. त्या ऐवजी प्रभाग क्रं.७९ मुकंदवाडी मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरणा ऐवजी कॉक्रीटकरणासाठी र.रू. १५.०० लक्ष खर्च करण्यात यावे तसेच जी बी आर ई -१ मध्ये पान क्रं.१ वरील अनु. ७ वर ड्रेनेज साठी १० लक्षची तरतुद करण्यात आली आहे त्यापैकी ०५ लक्ष कॉक्रीटकरणासाठी खर्च करण्यात यावी करिता लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :-श्री.नारायण कुचे अनुमोदक :- सौ.कमल नरोटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रं. ७९ मुकंदवाडी मध्ये (१.) विविध ठिकाणी डांबरीकरणासाठी सन २०११-२०१२ च्या अर्थ संकल्पात जी बी आर ई -१ मध्ये रक्कम रू.१५ लक्ष तरतुद करण्यात आली आहे. त्या ऐवजी प्रभाग क्रं.७९ मुकंदवाडी मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण,कॉक्रीटकरणासाठी र.रू. १५.०० लक्ष खर्च करण्यास (२.) जी बी आर ई -१ मध्ये पान क्रं.१ वरील अनु. ७ वर ड्रेनेज साठी १० लक्षची केलेल्या तरतुदीतुन ०५ लक्ष कॉक्रीटकरणासाठी खर्च वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र :- ६६४**

आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहर हे ऐतीहासीक व पर्यटनाची राजधानी असलेले शहर आहे. विकास योजना आराखडा १९७५ साली शासनातर्फे मंजूर करण्यात आला तद्नंतर सन २००१ व २००२ साली दोन टप्यात शासनाची मान्यता मिळाली.

विकास आराखडा योजना राबविण्यासाठी सुमारे ३५ वर्षाचा कालावधी गेल्यामुळे शहर बकाल झालेले आहे,रस्ते अरुंद आहेत,अतिक्रमणे आहेत. शहराचा विस्तार झाल्याने लोकसंख्या वाढली आहे. तसेच शहरात वाहानांची संख्या देखील वाढलेली आहे अरुंद रस्ते असल्याने रहदारीची कोंडी होत आहे. अनेक ठिकाणी तर मुख्य बाजारपेठ असल्यावरही ऐकरीच वाहतुक करणे भाग पडते अनेक रस्त्यावर ४० ते ५० वर्षाच्या मोडकळीस आलेल्या इमारती असुन त्या निष्काशीत करणेही अत्यंत आवश्यक झालेले होते. सबब समुरे ३५ वर्षानंतर अत्यंत जोरदारपणे रस्ता रुंदीकरण मोहीम हाती घेतलेली आहे. शहरातील नागरीक,स.पदाधिकारी, प्रसार माध्यमे व शासन इ. या सर्वानी या मोहीमेस प्रचंड बळ दिले आहे.

अत्यंत युध्द पातळीवर रस्ता रुंदीकरणाचा कार्यक्रम खालील रस्त्यावर राबविण्यात आला असून या ठिकाणी पैठणगेट ते गुलमंडी १५.०० मीटर रुंद,गुलमंडी ते सिटी चौक व्हाया रंगारगल्ली १२.०० मीटर रुंद व सिल्लेखाना ते पैठणगेट ३०.०० मीटर रुंद व महात्मा फुले चौक ते बारा भाई ताजीया चौक १८.०० मीटर रुंद या विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन २०११-२०१२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रक रक्कम रु.७.१५/- कोटी आहे. सदर कामाची ई निविदा व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहीर फेर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या .

१. मे.जी.एन.आय.इंन्फ्रास्ट्रेक्चर प्रा.लि. अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.१३% जास्त दराने

उपरोक्त प्राप्त निविदा मे.जी.एन.आय.इंन्फ्रास्ट्रेक्चर प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच २१.१३% जास्त दराची आहे. सदर प्राप्त दर खुपच जास्त असल्याने निविदेतील दरा बाबत प्रत्यक्ष वाटाघाटी केली असता त्यात ६.१३% जास्त दराने काम करावे असे ठरले त्या प्रमाणे गुप्तेदाराने लेखी स्वरुपात मान्य केल्या प्रमाणे ६.१३% जास्त दर मान्य करण्यात आले.

करिता मे.जी.एन.आय.इंन्फ्रास्ट्रेक्चर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.१३% जास्त दराच्या निविदा तसेच अंदाजपत्रक रक्कम रु. ७.४५ कोटी कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट ते गुलमंडी १५.०० मीटर रुंद,गुलमंडी ते सिटी चौक व्हाया रंगारगल्ली १२.०० मीटर रुंद व सिल्लेखाना ते पैठणगेट ३०.०० मीटर रुंद व

महात्मा फुले चौक ते बारा भाई ताजीया चौक १८.००मीटर रुंद या विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.७.१५/- कोटी असुन मे. जी. एन. आय. इंन्फ्रास्ट्रेक्चर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.१३% जास्त दराच्या निविदा तसेच अंदाजपत्रक रक्कम रु. ७.४५ कोटी कार्योत्तर मान्यतेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा** :

श्री.काशिनाथ कोकाटे :मागिल बैठकीत टॅक्सच्या संदर्भात प्रस्ताव होता स.सदस्यांना त्याची माहिती नाही. जनतेच्या निगडीत विषय असल्याने त्यावर चर्चा होवून योग्य निर्णय होणे आवश्यक आहे.

श्री.गिरजाराम हळनोर :या ऐनवेळच्या प्रस्तावास मागिल बैठकीत आपण दुरूस्तीसह मंजूरी दिली व दुरूस्तीचे अधिकार मा.महापौर स.पदाधिकारी यांना दिले होते दुरूस्ती काय केली त्यांची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी व ऐनवेळी आलेले सर्व विषय आता मंजूर करावे.

मा.उपमहापौर :दोन वर्षापूर्वी शासनाने १२ व १३ व्या वित्त आयोगानुसार महापालिकेला मोठा निधी दिला त्यात रस्त्याची कामे केली ते काम चांगले करावे व काम केल्यानंतर त्या संबधीत ठेकेदारानेच ३ वर्ष देखभाल दुरूस्ती त्या रस्त्याची करावी असा प्रस्ताव होता ७ ते ८ कोटी जास्तीचे दिले.आज त्यातील टीव्ही सेन्टर ते सलीम अली सरोवर तसेच महेशनगर जालनारोड पासून ॲपेक्स हॉस्पीटल पर्यतचा पूर्ण रस्ता खराब झाला.. ठराविक रस्ते वगळले तर बाकी सर्व रस्ते खराब झाले निवडणुकीच्या काळात त्या रस्त्याची कामे झाली.होती जे प्रस्ताव आता रस्त्याचे कामाचे आले त्याकडे बारकाईने लक्ष देवून काम करावे शासन स्तरावर चौकशी होवू शकते.मी पत्र दिले त्यावर अहवाल दयावा असे म्हटले होते किती रस्त्याची त्यावेळी कामे केली त्याची परीस्थिती काय आहे त्यांचा अहवाल पुढील बैठकीत देण्याच्या सुचना कराव्यात पावसाळयाच्या अगोदर रस्ते व्हावेत ज्या कामासाठी शासनाचा निधी आहे तो परत जाणार नाही याची दखल घ्यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :मागिल बैठकीत जळगाव टीपॉईटचा जो सर्वीस रस्ताचे ४.५० ोटीचा प्रस्ताव होतो १० वार्डातून तो रस्ता इतर ठिकाणी जातो ८ वर्षात त्या रस्त्याचे कोणतेच काम केले नाही त्यावेळी प्रशासनाचे इतर रस्ते बरोबर हा प्रस्ताव सादर करावा असे ठरले होते जे रस्त्याच्या संबधी प्रसताव आले तो प्रस्ताव का आलेला नाही.

श्री.किशोर नागरे :मागच्या वेळेस असे म्हटले की हा डिफर पेमेन्टवर हा रस्ता करणार निधी कमी असल्याने त्यामध्ये समावेश करू असे म्हटले होते.का प्रस्ताव आला नाही

श्री.काशिनाथ कोकाटे :गरवारे स्टेडीयम जलतरण तलावाचे तसेच बॉटनिकल गार्डनचे कामही पूर्ण झाले नाही खुलासा करावा.

श्रीमती रेखा जैस्वाल :सिडको हडको भागातील रस्त्याचीच विकास कामे का होत नाही

श्री.गिरजाराम हळनोर :पुढील बैठकीत प्रशासनाच्या मार्फत प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत करावे

मा.महापौर :प्रशासनाने कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र :- ६६५</u>**

आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहर हे ऐतीहासीक व पर्यटनाची राजधानी असलेले शहर आहे. विकास योजना आराखडा १९७५ साली शासनातर्फे मंजूर करण्यात आला तद्नंतर सन २००१ व २००२ साली दोन टप्यात शासनाची मान्यता मिळाली.

विकास आराखडा योजना राबविण्यासाठी सुमारे ३५ वर्षाचा कालावधी गेल्यामुळे शहर बकाल झालेले आहे,रस्ते अरुंद आहेत,अतिक्रमणे आहेत. शहराचा विस्तार झाल्याने लोकसंख्या वाढली आहे. तसेच शहरात वाहानांची संख्या देखील वाढलेली आहे अरुंद रस्ते असल्याने रहदारीची कोंडी होत आहे. अनेक ठिकाणी तर मुख्य बाजारपेठ असल्यावरही ऐकरीच वाहतुक करणे भाग पडते अनेक रस्त्यावर ४० ते ५० वर्षाच्या मोडकळीस आलेल्या इमारती असुन त्या निष्काशीत करणेही अत्यंत आवश्यक झालेले होते. सबब समुारे ३५ वर्षानंतर अत्यंत जोरदारपणे रस्ता रुंदीकरण मोहीम हाती घेतलेली आहे. शहरातील नागरीक,स.पदाधिकारी, प्रसार माध्यमे व शासन इ. या सर्वानी या मोहीमेस प्रचंड बळ दिले आहे.

अत्यंत युध्द पातळीवर रस्ता रुंदीकरणाचा कार्यक्रम खालील रस्त्यावर राबविण्यात आला असून या ठिकाणी लक्ष्मण चावडी ते दादा कॉलनी २४.०० मीटर रुंद व दादा कॉलनी ते कैलासनगर स्मशानभुमी या १८.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन २०११-२०१२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रक रक्कम रु.४,२९/- कोटी आहे. सदर कामाची ई निविदा व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहीर फेर निविदा सुचना प्रसिध्द करुन मागविण्यात आल्या . खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झाले .

१. मे.जी.एन.आय.इंन्फ्रास्ट्रेक्चर प्रा.लि. अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.१३% जास्त दर

उपरोक्त प्राप्त निविदा मे.जी.एन.आय.इंन्फ्रास्ट्रेक्चर प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच १३.१३% जास्त दराची आहे. सदर प्राप्त दर खुपच जास्त असल्याने निविदेतील दरा बाबत प्रत्यक्ष वाटाघाटी केली असता त्यात ६.१३% जास्त दराने काम करावे असे ठरले त्या प्रमाणे गुप्तेदाराने लेखी स्वरुपात मान्य केल्या प्रमाणे ६.१३% जास्त दर मान्य करण्यात आले.

करिता मे.जी.एन.आय.इंन्फ्रास्ट्रेक्चर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.१३% जास्त दराच्या निविदा तसेच अंदाजपत्रक रक्कम रु. ४.२९ कोटी कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लक्ष्मण चावडी ते दादा कॉलनी २४.०० मीटर रुंद व दादा कॉलनी ते कैलासनगर स्मशानभुमी या १८.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.४,२९/- कोटी असुन मे.जी.एन.आय.इंन्फ्रास्ट्रेक्चर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.१३% जास्त दराच्या निविदा तसेच अंदाजपत्रक रक्कम रु. ४.२९ कोटी कार्योत्तर मान्यतेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र :- ६६६**

आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहे की,औरंगाबाद शहर हे ऐतीहासीक व पर्यटनाची राजधानी असलेले शहर आहे. विकास योजना आराखडा १९७५ साली शासनातर्फे मंजूर करण्यात आला तद्नंतर सन २००१ व २००२ साली दोन टप्पात शासनाची मान्यता मिळाली .

विकास आराखडा योजना राबविण्यासाठी सुमारे ३५ वर्षाचा कालावधी गेल्यामुळे शहर बकाल झालेले आहे,रस्ते अरुंद आहेत,अतिक्रमणे आहेत. शहराचा विस्तार झाल्याने लोकसंख्या वाढली आहे. तसेच शहरात वाहानांची संख्या देखील वाढलेली आहे अरुंद रस्ते असल्याने रहदारीची कोंडी होत आहे. अनेक ठिकाणी तर मुख्य बाजारपेठ असल्यावरही ऐकरीच वाहतुक करणे भाग पडते अनेक रस्त्यावर ४० ते ५० वर्षाच्या मोडकळीस आलेल्या इमारती असुन त्या निष्काशीत करणेही अत्यंत आवश्यक झालेले होते. सबब समुरे ३५ वर्षानंतर अत्यंत जोरदारपणे रस्ता रुंदीकरण मोहीम हाती घेतलेली आहे. शहरातील नागरीक,स.पदाधिकारी, प्रसार माध्यमे व शासन इ. या सर्वानी या मोहीमेस प्रचंड बळ दिले आहे.

अत्यंत युध्द पातळीवर रस्ता रुंदीकरणाचा कार्यक्रम खालील रस्त्यावर राबविण्यात आला असून या ठिकाणी सराफा ते पानदरीबा ते अंगुरीबाग या १२ मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन २०११-२०१२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रक रक्कम रु.१.४५/- कोटी आहे. सदर कामाची ई निविदा व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहीर फेर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या. खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झाले.

१. मे.रे. इंजिनीरिंग लि. अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.५% जास्त दर

उपरोक्त प्राप्त निविदा मे.रे. इंजिनीरिंग लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच १४.५% जास्त दराची आहे. सदर प्राप्त दर खुपच जास्त असल्याने निविदेतील दरा बाबत प्रत्यक्ष वाटाघाटी केली असता त्यात ६.१३% जास्त दराने काम करावे असे ठरले त्या प्रमाणे गुप्तेदाराने लेखी स्वरुपात मान्य केल्या प्रमाणे ६.१३% जास्त दर मान्य करण्यात आले.

करिता मे.रे. इंजिनीरिंग लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.१३% जास्त दराच्या निविदा तसेच अंदाजपत्रक रक्कम रु. १.४५ कोटी कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सराफा ते पानदरीबा ते अंगुरीबाग या १२ मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या अंदाजपत्रक रक्कम रु.१.४५/- कोटी असुन मे.रे. इंजिनीरिंग लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.१३% जास्त दराच्या निविदा तसेच अंदाजपत्रक रक्कम रु. १.४५ कोटी कार्योत्तर मान्यतेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६७ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील विकास योजना आराखड्यानुसार रुंदीकरण करण्यात आलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजुने जलनिसा:रण वाहिनी टाकण्याचे कामा अंतर्गत गुलमंडी ते बाराभाई ताजीयॉ ते श्रीमान श्रीमती बिल्डींग व पैठणगेट ते श्रीमान श्रीमती बिल्डींग पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुस समांतर ३०० मीमी. व्यासाची SWG ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जिवन प्राधिकरण खात्याचे सन २०१०-२०११ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रु.२९,०१,०००/- चे तयार करण्यात आले आहे. यास

प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदरील कामासाठी एकुण तीन वेळेस निविदा मागविण्यात आल्या असता प्रथम वेळेस एकच निविदा प्राप्त झाली व दुस-या व तीस-या वेळेस एकही निविदा प्राप्त झाली नाही. परंतु प्रथम वेळेस निविदा खालील प्रमाणे दर भरुन प्राप्त झाली होती.

१.मे.एल.के.कन्स्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.७६% जास्त दराने.

दुस-या व तीस-या वेळेस एकही निविदा प्राप्त झाली नसल्याने उपरोक्त प्रथम निविदा धारक मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.७६% जास्त दर आहे. सदर दर खुपच जास्त असल्याने प्रत्यक्ष वाटाघाटी केली असता सदरील काम प्रथम वेळेस प्राप्त निविदा दर २४.७६% जास्त दराने काम करावे असे ठरले. त्या प्रमाणे गुत्तेदाराने लेखी स्वरुपात मान्य केल्यानुसार २४.७६% जास्त दर मान्य करण्यात आले.

करीता मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.७६% जास्त दराच्या निविदा तसेच अंदाजपत्रक रक्कम रु.२९,०१,०००/- च्या कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील विकास योजना आराखड्यानुसार रुंदीकरण करण्यात आलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजुने जलनिसाःरण वाहिनी टाकण्याचे कामा अंतर्गत गुलमंडी ते बाराभाई ताजीयॉ ते श्रीमान श्रीमती बिल्डींग व पैठणगेट ते श्रीमान श्रीमती बिल्डींग पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुस समांतर ३०० मीमी. व्यासाची SWG ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाचे रक्कम रुपये २९,०१,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील कामाचे ठेंकेदार मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचे २४.७६% जास्त दराच्या निविदेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६८ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील विकास योजनेतील रस्ते तसेच एम.आय.डी.सी.भागातील रस्त्यांची कामे डिफर्ड पेमेंट या तत्वाअंतर्गत करण्यात येत आहेत. या कामांची एकुण किंमत अनुक्रमे ३०.०० कोटी व २०.०० कोटी असे एकुण रुपये ५०.०० कोटी एवढी आहे. या कामावर दैनंदिन देखरेख करणे, निविदेतील मानकानुसार कामे करुन घेणे, झालेल्या कामांची तसेच कामे चालु असतांना कामावरील साहित्याची वेळोवेळी चाचणी करणे, सक्षम कार्यालयामार्फत (प्रयोगशाळा) चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे, कामांचे मोजमाप घेऊन त्याची देयके तयार करणे, इत्यादी व या सारख्या इतर तांत्रिक कामाकरीता वरील डिफर्ड पेमेंट रस्त्यांसाठी पी.एम.सी. नियुक्ती करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने शासन निर्णय देखील झालेला असुन ५०.०० लक्ष पेक्षा अधिक किंमतीच्या सर्व विकास कामाकरीता विशिष्ट कौशल्य असलेल्या लेखा परिक्षकांची नियुक्ती करणे बाबत तसेच सुयोग्य तांत्रिक संस्थाची / तज्ञ व्यक्तिंची तांत्रिक लेखा परिक्षक म्हणुन नियुक्ती करणे बाबत अनिवार्य केले आहे.

त्यानुसार दिनांक ३१.१२.२०११ रोजी शहरात व चिकलठाणा भागा मध्ये चालु असलेल्या डिफर्ड पेमेंट धर्तीवर जे काम चालु आहे त्यासाठी दिनांक ३१.१०.२०११ रोजी कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये एकच निविदा ही मे.देवगिरी कंन्सलटंट यांची प्राप्त झाली. त्यांनी त्यामध्ये कामाच्या निविदा रक्कमेवर जो खर्च होईल त्यावर २.५०% दराने रक्कम देण्याबाबतची निविदा सादर केली होती. वरील दराच्या वाटाघाटीसाठी मे.देवगिरी कंन्सलटंट यांना दिनांक ०१.११.२०११ रोजी बोलाविण्यात आले असता त्यांनी २.००% इतक्या दराने लेखी मान्यता दिली होती.

त्यानंतर मा.आयुक्त महोदय यांनी वरील दर अजुन कमी करुन १.७५% इतक्या दराने काम करण्यास मान्यता दिलेली आहे.

सबब उक्त निर्णयानुसार शहरातील डिफर्ड पेमेंटचे कामाकरीता पी.एम.सी. म्हणुन मे.देवगिरी कंन्सलटंट यांची नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना उक्त कामाकरीता त्यांचा देकार दर म्हणुन निविदा रक्कमेच्या १.७५% मान्य करण्यासाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील डिफर्ड पेमेंटचे कामाकरीता पी.एम.सी.म्हणुन मे.देवगिरी कंन्सलटंट यांच्या नियुक्तीस व त्यांना उक्त कामाकरीता त्यांचा देकार दर म्हणुन निविदा रक्कमेच्या १.७५% इतक्या दराने मान्य करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६६९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,स्वामी विवेकानंद उद्यान टी.व्ही.सेंटर मजनुहिल येथे महात्मा बसबेश्वर यांचा अश्वरूढ पुतळा उभारणे बाबत शहरातील विविध समाजिक संघटनानी मागणी केली असून तशी विनंती पत्रे प्रशासनास प्राप्त झालेली आहे. तसेच स्वामी विवेकानंद उद्यानात महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती अश्वरूढ पुतळा उभारणे बाबत मा. सर्व साधारण सभेने ठराव क्र- ३४८ दि.१८/०५/२०११ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार महात्मा बसवेश्वर यांचा अश्वरूढ पुतळा उभारणे व पुतळयाचा परिसर विकसीत करणे करीता सा.बा.विभागाचे सन २०११-२०१२ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१००.०० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. यामध्ये पुतळयाचा परिसर विकसीत करणे,लॉन लावणे व विद्दुतीकरण करणे,या बाबीचा समावेश आहे. या शिवाय महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती अश्वरूढ शिल्प तयार करण्यांसाठी दरपत्रक मागविले असता ते रक्कम रू.४२.१० लक्ष ऐवढे प्राप्त झाले आहे. यशिवाय पुतळा ज्या चबुत-यावर बसविण्यात येणार आहे त्याचा खर्च वेगळा लागणार आहे. अशा प्रकारे एकुण रक्कम रू.१५०.०० लक्षचा प्रस्ताव तयार करण्यांत आलेला आहे.

पुतळा उभारणे बाबत महाराष्ट्र शासनाने १६ बिंदु नामावली त्याचेकडील परिपत्रकानुसार प्रसिध्द केली असून यामध्ये विविध विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र व राज्य शासनाच्या मान्यतेचा समावेश आहे. या पुर्ण १६ बिंदुची पुर्तता झाल्याशिवाय पुतळा उभारता येणार नाही. ही प्रक्रिया लांबलचक व वेळखाऊ असल्याने महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती अश्वरूढ पुतळा उभारणीचे मान्यतेची वेगळी संचिका तयार करण्यांत आली असून मंजुरीच्या प्रक्रियेत आहे.

सदर कामाचा एकूण रक्कम रू. १५०.०० लक्षाचा प्रस्ताव असून पुतळयाचा परिसर विकसित करणे करीता रक्कम रू.१००.०० लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सन २०१२-२०१३ या अर्थिक वर्षात रक्कम रू. ५०.०० लक्ष ची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. तुर्त पुतळयाचा परिसर विकसित करणेसाठी चे अंदाजपत्रक रक्कम रू.१००.०० लक्षचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर .

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्वामी विवेकानंद उद्यान टी.व्ही.सेंटर मजनुहिल येथे महात्मा बसबेश्वर यांचा अश्वरूढ पुतळयासाठीचा परिसर विकसित करणेसाठी चे रक्कम रू.१००.०० लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी .

मा.महापौर :ऐनवेळचा जीटीएल संदर्भात प्रस्ताव आहे त्यासही मंजूरी देण्यात येते.

**<u>विषय क्र :- ६७०</u>**

औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असून सुमारे ४०० वर्षापूर्वी वसलेले आहे. औरंगाबाद शहराचा विकास योजना आराखडा सन १९७५ साली महाराष्ट्र शासनातर्फे मंजूर करण्यात आला. तद्नंतर २००१ व २००२ मध्ये २ टप्यात महाराष्ट्र शासनाने अंतिम मंजुरी दिली.

इतिहासकालीन वसलेल्या शहरात आहे त्या रचनेनूसार तत्कालीन महाराष्ट्र विद्युत मंडळातर्फे विद्युत व्यवस्था सुमारे ५० ते ६० वर्षापूर्वी केलेली दिसुन येते. त्यावेळेस नगरपरिषद / नगरपालिका या महाराष्ट्र शासनाच्या संस्था कार्यरत होत्या. त्यामुळे महाराष्ट्र शासनाचा विभाग महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना सदर संस्थेची विद्युत खांब रोहित्र उभारणी करीता परवानगीची आवश्यकता भासली नसावी असे मत आहे व त्याचमुळे कदाचित विद्युत खांब व रोहित्र यांनी व्यापलेल्या जमिनीचा दोन्ही विभाग महाराष्ट्र शासनाचेच असल्याने लिज रेन्ट (पट्टा करार) सुध्दा आकारण्यात आलेला नसावा.

डिसेंबर १९८२ पासून नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत झाले असून तबल ३५ वर्षानंतर औरंगाबाद शहर विकास आराखडा राबविण्याचे काम महानगरपालिकेने सुरु केलेले आहे.

सदर मोहिम युध्द पातळीवर सुरु करण्यात आली असून विकास आराखड्याप्रमाणे रस्ते रुंदीकरण करण्यात आलेले आहे. असे एकूण २६ रस्ते विकास अराखड्याप्रमाणे विकसीत करावयाचे असून अद्यापपर्यंत १४ रस्ते संपूर्ण विकसीत करण्यात आलेले आहे व यामुळे ५० ते ६० वर्षापूर्वी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने उभारलेल्या उच्चदाब, लघुदाब, उपरी मार्ग विद्युत वाहिन्या, विद्युत खांब, विद्युत रोहित्रे हे रस्त्याच्या रुंदीकरणाच्या रुंद झालेल्या रस्त्याच्या मधोमध आलेले आहेत. त्यामूळे रस्ता विकसीत करुनही त्याचा पूर्ण उपयोग होत नाही. त्याकरीता सदर विद्युत खांब, रोहित्रे रस्त्याच्या कडेला स्थलांतरीत होणे आवश्यक आहे.

जी.टी.एल. कंपनीसोबत स्थानिक स्तरावर चर्चा, बैठका होवून खालीलप्रमाणे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

१. जा.क्र./मनपा/विद्युत/२० दि. १९.०१.२०१२
२. जा.क्र./मनपा/विद्युत/२३ दि. २४.०१.२०१२
३. जा.क्र./मनपा/विद्युत/३८ दि. १५.०२.२०१२
४. जा.क्र./मनपा/विद्युत/४१ दि. १७.०२.२०१२
५. जा.क्र./मनपा/विद्युत/अशअ/६०५ दि. ०१.०३.२०१२

मा.खासदार श्री चंद्रकांतजी खैरे यांचे माहेवार जिल्हास्तरीय विद्युतीकरण बैठकीत सदर विषयावर चर्चा होवून जी.टी.एल. / महावितरण कंपनीस रस्त्यात बाधीत होणारे विद्युत खांब व रोहित्रे तसेच उपरीमार्ग विद्युत वाहिन्या इत्यादी सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यासाठी जी.टी.एल. / महावितरण कंपनीस आदेशित केलेले आहे. तसेच दि. ४.३.२०१२ रोजी जी.टी.एल. कंपनीचे मुख्य श्री जगदीश चेलारमाणी (Business head G.T.L.) यांना पत्राद्वारे कळविलेले आहे.

रस्त्यात उभारणी केलेले विद्युत खांब, विद्युत रोहित्र ही यंत्रणा ५० ते ६० वर्षापूर्वीची जुन्या पध्दतीची असल्याने व सध्या शहरीकरण झाल्याने या यंत्रणेचे नुतनीकरण करणे त्या त्या विभागाचे काम असते. त्यामुळे या यंत्रणेचे नुतनीकरण जी.टी.एल. / महावितरण यांनीच करावे, कारण या यंत्रणेपासून तेच व्यवसाय करणार असल्याने याचा खर्च मनपावर लादू नये असे वाटते.

दि.१४ फेब्रुवारी २०१२ रोजी जी.टी.एल. तर्फे १४ रस्त्यावरील विद्युत खांब, विद्युत रोहित्र इत्यादी स्थलांतरीत करण्यासाठी रु. १२.७६ कोटीची डिमांड नोट (कोटेशन) महानगरपालिकेस पाठविलेले आहे व सदरील रक्कमेचा भरणा केल्याशिवाय विद्युत खांब व विद्युत रोहित्र स्थलांतरीत करण्याची कार्यवाही करता येत नाही, असे कळविले आहे.

महानगरपालिकेच्या जागेवर विद्युत खांब व विद्युत रोहित्र याची उभारणी जी.टी.एल. / महाराष्ट्र विज वितरण कंपनीतर्फे केलेली असून या जागेचा लिजरेन्ट (पट्टा करार) रक्कम रु. ८०.०० कोटी अपेक्षीत असून त्याचा भरणा जी.टी.एल. / महाराष्ट्र विज वितरण कंपनीने करणे बाबत पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. तसेच एल.बी.टी. बाबत स्थानिक संस्था कर नियम ३, ९ नूसार जी.टी.एल. कंपनीने एल.बी.टी. चे रजिस्ट्रेशन करणे बाबतही कळविण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेतर्फे रस्त्यात बाधीत होणाऱ्या मालमत्तेचे अधिग्रहण करुन काढून घेण्यात येत आहे. त्यामूळे शहरातील रस्त्यावरील घरे पाडून जागा ताब्यात घेण्यात येत आहे. रस्ता रुंदीकरणाचे काम दि. १५ मे २०१२ पर्यंत करणे आवश्यक आहे. त्यानंतर पावसाळा सुरु होत असल्याने ही कामे उपरोक्त कालावधीत करणे अत्यंत आवश्यक आहे.

विकास आराखड्या अंतर्गत नागपूर महानगरपालिकेने रस्ते रुंदीकरणाचा उपक्रम हाती घेतलेला होता. यात नागपूर महानगरपालिकेने रस्त्यातील विद्युत खांब व रोहित्रे स्थलांतरीत करण्यासाठी ५० टक्के रक्कमेचा भरणा केलेला होता. याबाबत शहानिशा केली असता मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा केवळ नागपूर महानगरपालिकेसाठीच लागू करण्यात आला आहे असे निदर्शनास आले आहे. जर हा निर्णय औरंगाबाद महानगरपालिकेस लागू झाला तर या कामी होणारा महानगरपालिकेचा खर्च टाळता येईल.

महानगरपालिकेतर्फे विकसीत करण्यात येणाऱ्या रस्त्यात बाधीत होणारे विद्युत खांब, विद्युत रोहित्रे व विद्युत वाहिन्या इ. बाबी जी.टी.एल. / महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने स्थलांतरीत करण्यासाठी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विज नियमक आयोग, मुंबई यांना पत्राद्वारे जा.क्र./मनपा/विद्युत/६४ /२०१२ दि. १७.०३.२०१२ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

जी.टी.एल. कंपनीने दिलेले कोटेशन तसेच खाजगी ठेकेदारातर्फे डिफर्ड पेमेंटवर काम करणाऱ्या एजन्सीतर्फे दर मागवून दोन्ही दरांची तुलना केली असता डिफर्ड पेमेंटवर काम करणा-या एजन्सीचे दर जवळपास ९० टक्के जास्तीचे प्राप्त झालेले आहेत.

विकसीत होणाऱ्या रस्त्यातील विद्युत खांब, विद्युत रोहित्रे (Transformar), उच्चदाब, लघुदाब, विद्युत वाहिनी इ. स्थलांतरीत करण्यासाठी १.३ टक्के देखदेख निगराणी चार्जेस (Supervision Charges) जी.टी.एल. कंपनीस भरणा करुन इतर एजन्सी मार्फत हे काम करता येईल का ? याबाबतही विचार करण्यात आलेला आहे. याबाबत महानगरपालिकेकडे कर्मचाऱ्यांची उपलब्धता व कामाचे स्वरुप पाहता हे काम करणे महानगरपालिकेस शक्य नाही.

जी.टी.एल. कंपनीतर्फे दि. ७.३.२०१२ तसेच मा.मुख्य अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, औरंगाबाद यांनी पत्र पाठवून जी.टी.एल. कंपनीतर्फे देण्यात आलेले कोटेशनचा रु. १२.७६ कोटीचा भरणा केल्यानंतर सदर कामास सुरुवात करण्यात येईल तसेच महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. एल.एन.डी. – १०९५/१३८१/ प्र.क्र. ६५ / जप दि.६.१२.१९९६ नूसार महाराष्ट्र विज मंडळास असे कोणतेही भाडे भरणा करण्यापासून सुट देण्यात येईल व विद्युत अधिनियम – २००३ नूसार विज ही कोणत्याही वस्तुमध्ये समाविष्ट होत नसल्याने त्यावर स्थानिक संस्था कर (एल.बी.टी.) लागू होत नाही असे पत्रात नमूद केलेले आहे.

विकास आराखड्या अंतर्गत ज्याप्रमाणे महानगरपालिकेने रस्ते विकसीत करण्याची मोहिम सुरु केलेली आहे. त्यामध्ये जी.टी.एल. / महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचा

सहभाग असणे आवश्यक असतांना या सर्व कामांच्या खर्चाचा आर्थिक बोजा महापालिकेस सहन करावा लागत आहे.

महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी करण्यात येणारा पाठपुरावा तसेच नागरीकांना सुविधा देण्याच्या दृष्टीने तसेच तात्काळ सदरची कामे होण्यासाठी दि. १९.०३.२०१२ रोजी जी.टी.एल. कंपनीचे प्रतिनिधी श्री. राकेश सिन्हा (असोसिएट्स व्हाईस प्रेसिडेंट) यांचेशी विद्युत खांब व रोहित्र स्थलांतरीत करणे बाबत चर्चा करण्यात आली व दिनांक २०.०३.२०१२ रोजी जी.टी.एल. कंपनीने असे पत्र दिले की, महानगरपालिकेने प्राधान्याने सुचविलेल्या रस्त्यावरील विद्युत खांब व विद्युत रोहित्र स्थलांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल तसेच काम सुरु केल्यानंतर १५ दिवसाचे आत १०० टक्के रक्कमेचा भरणा महानगरपालिकेस करावा लागेल असे कळविलेले आहे.

वास्तविक जी.टी.एल. कंपनी ही व्यवसाय करीत आहे, डी.पी. व पोल शिफ्टींगचा खर्च हा भांडवली स्वरुपाचा खर्च आहे. हा संपूर्ण खर्च महानगरपालिकेने करणे योग्य वाटत नाही. तसेच डी.पी. स्थलांतरीत करणे व भुमिगत केबल टाकणे हे वास्तविक MSEDCL / GTL यांचे काम आहे. तथापि MSEDCL व GTL ने महानगरपालिकेचा प्रस्ताव मान्य केलेला नाही. पावसाळ्यापूर्वी रस्त्याची कामे पूर्ण करणे आवश्यक असल्याने सदर बाब महासभेच्या विचारार्थ व योग्य त्या निर्णयास्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

औरंगाबाद शहराचा विकसित होणाऱ्या रस्त्यामध्ये उभे असलेले विद्युत खांब, विद्युत ट्रान्सफार्मर स्थलांतरीत करण्यासाठी १४ रस्त्याची डिमांड जी.टी.एल. कंपनीतर्फे करण्यात आलेली आहे. सदर काम जी.टी.एल. तर्फे ओ.आर.सी. मध्ये करण्यात येणार आहे. जी.टी.एल. कंपनीने १४ रस्त्यावरील विद्युत खांब, विद्युत डी.पी. स्थलांतरीत करण्यासाठी व सदर कामे पावसाळ्यापूर्वी करणे अत्यावश्यक असल्याने जी.टी.एल. कंपनीने केलेली मागणी रक्कम रु. १२.७६ कोटीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. तसेच महानगरपालिकेने सुचविलेल्या प्राधान्यानुसार जी.टी.एल. कंपनीने कामे करावीत.जी.टी.एल. कंपनीच्या कामाचा आढावा घेऊन त्यानुसार जी.टी.एल.कंपनीस रक्कम अदा करण्याच्या अटीवर प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
**महानगरपालिका औरंगाबाद**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभा
## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (३७)
## बुधवार दिनांक २१/०३/२०१२ (दिनांक १६/०३/२०१२ ची तहकुब सभा) रोजी आयोजित सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.

**स.पालिका सदस्या श्रीमती सविता भगवान घडमोडे**

**प्रश्न क्र.१०४:-**

महानगरपालिकने बीओटी तत्वावर एकुण किती मालमत्ता विकासकास दिलेल्या आहे. त्याबाबतची प्रत्येक कामाची सविस्तर माहिती खालील तक्त्यानुसार देण्यात यावी.
बीओटी वरील मालमत्तेचे नाव/ठिकाण/सर्व्हे नं. सदरील जागेचे आरक्षण कशासाठी देण्यात आलेली आहे. जागेचे एकुण क्षेत्रफळ, बीओटीवर दिलेल्या जागेचे क्षेत्रफळ, जागेची बाजार भावानुसार व शासकीय भावानुसार किमंत, बीओटीवर देण्यात आलेले जागेची रितसर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती काय असल्यास निविदा क्र. दिनांक सर्वसाधरण सभा व स्थायी समिती मंजूर ठराव क्र. दिनांक निविदा कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदेतील प्राप्त निविदा दर किती एजन्सीने निविदा दाखल केलेल्या होत्या याची सविस्तर माहिती, निविदा मंजुरी बाबतचा प्रस्ताव कोणत्या सभेसमोर सादर करण्यात आलेला होता त्याचा क्रमांक व दिनांक, मंजुर दर/महानगरपालिकेस विकासकाकडुन प्रतिवर्षी /महिना उजेक्षित उत्पन्न विकासकासोबत नोंदणीकृत करारनामा करण्यात आलेला आहे काय त्याचा नोंदणी क्रमांक व दिनांक, विकासकाने मनपास जमा केलेली अनामत रक्कम किती व सदरील रक्कम कश्याच्या आधारावर ठरविण्यात आलेली आहे. विकासकास सदरील जमिन किती वर्षासाठी लिजवर देण्यात आलेली आहे. विकासकाने नियमानुसार महानगरपालिकेची बांधकाम परवानगी घेतलेली आहे काय असेल तर त्याची नगररचना परवानगी क्रमांक व दिनांक, विकासकाने काम पुर्ण केलेले असल्यास ते कोणाच्या देखरेखीखाली पुर्ण केलेले आहे त्याच्या कामाच्या नोंदी मनपाने नोंदविलेल्या आहे काय, विकासकाने चालु केलेले व पुर्ण केलेले बांधकाम नियमानुसार आहे काय, बीओटीवरदेण्याच्या जागेची किंमत कश्याच्या आधारे ठरविण्यात आलेली आहे याचा अहवाल कोणी तयार केलेला आहे, बीओटी वर देण्यात आलेल्या विकासकाचे नाव व पुर्ण पत्ता व सविस्तर माहिती, विकासकास देण्यात आलेल्या जागेचे आरक्षण बदलण्यात आलेल्या विकासकाचे नाव व पुर्ण पत्ता व सविस्तर माहिती, विकासकास देण्यात आलेल्या जागेचे आरक्षण बदलण्यात आलेले आहे काय त्यास शासनाची मंजूरी आहे काय. किती जागा विकासकास देण्याचे प्रस्तावित आहे. याबाबतची सविस्तर माहिती.

**बि.ओ.टी. कक्ष प्रमुख**

**उत्तर :-**

बांधा वापरा व हस्तांतरीत करा (B.O.T.) या शासनाच्या धोरणास अनुसरुन औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभागृहाच्या मंजुरी अधिन राहुन बीओटी तत्वावर खालील

प्रमाणे प्रकल्प विकसीत करण्यात येत आहेत. त्या बाबतचे करारनामे व मा.सर्व साधारण सभेने मंजुर केलेल्या ठरावाची प्रत सोबत संलग्न करण्यात येत आहेत. संदर्भिय पत्रात B.O.T.प्रकल्पाबाबत विचारण्यात आलेल्या विविध प्रश्नांबाबतची माहिती संबंधित कामांच्या करारनाम्यात व ठरावात नमुद आहे.

**१) सिध्दार्थ उद्यान बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे :-**

न.भू.क्र.२०७२३/पी सर्वे नं.०४ एकूण ३१ एकर जमिनीपैकी ७००० चौ.मी. क्षेत्रावर प्रकल्प विकसीत करावयाचा आहे. त्यामध्ये महानगरपालिकेसाठी ५७०८ चौ.मी. एवढया क्षेत्रात दुमजली पार्किग बांधुन मिळणार असुन विकासक यांना २३७३ चौ.मी. बांधीव क्षेत्र आणि ९३५ चौ.मी. क्षेत्रावर रुपये ५.०० प्रति चौ.मी.प्रति महा प्रमाणे भाडे पटयावर ९९ वर्षाच्या करारावर देण्यात आलेले आहे.

**२) न.भू.क्र.१९१४९ रेल्वे स्टेशन जवळील महापौर बंगल्या लगत व्यापारी संकुल उभारणे :-**

रेल्वे स्टेशन जवळील न.भू.क्र.१९१४९ येथील महानगरपालिकेच्या मालकीची ११०७७ चौ.मी.जागा आहे. सदर क्षेत्रात व्यापारी संकुल उभारावयाचे आहे. सदर प्रकल्प क्षेत्रावर महानगरपालिकेसाठी ५४० चौ.मी. बांधीव क्षेत्रावर बांधकाम पुर्ण झालेले असुन २७० चौ.मी. क्षेत्राचे वाहनमळाचे काम पुर्ण होवुन मनपास हस्तांतरीत झालेले आहे. तसेच विकसकाचे हिश्यात ५७९२.६२ चौ.मी. क्षेत्राचे बांधीव व्यापारी संकुल अनुज्ञेय राहणार आहे.

**३) शहानुरवाडी स.नं.१२ आरक्षण क्र.२६२ येथे आठवडी बाजार व संकुल विकासीत करणे :-**

शहानुरवाडी सर्वे सं.न. १२ आरक्षण क्र.२६२ येथील महानगरपालिकेच्या मालकीची १५८८१ चौ.मी. जागा आहे. सदर आरक्षण क्षेत्रात आठवडी बाजार,व्यापारी संकुल, वाहन तळ यासाठी विकासाची कामे प्रकल्पात समाविष्ट आहेत. सदर प्रकल्प क्षेत्रावर महानगरपालिकेसाठी १०००० चौ.मी. क्षेत्रावर आठवडी बाजार संकुल आणि २५० चौ.मी. क्षेत्रावर भाजी विक्रेत्यांसाठी ४० गाळयांचे दुकान केंद्र या प्रमाणे महानगरपालिका हिश्यातील विकसकाने पुर्ण केलेली आहेत.

**४) ज्योती नगर पोहण्याचा तलाव बी. ओ. टी. तत्वावर विकसित करणे :-**

ज्योती नगर येथे न.भू.क्र. १६२६१ या रेंखांकनातील खुली जागा येथे पोहण्याचा तलाव, व्यायाम शाळा या प्रकल्पासांठी मे. शलाका इंजिनियर्स आणि जे. व्ही. यांचेकडुन काम पुर्ण करण्यात आले आहे. प्रकल्पातील २११४.७५ चौ. मी. जागेमध्ये जलतरण तलावाचे बांधीव क्षेत्रासाठी विकसकाकडुन विनापरवाना रक्कम रुपये ४,००,०००/- मिळाली आहे. निविदा शर्ती अनुसार विकसकाने जलतरण तलावाची कामे पुर्ण करुन सदर प्रकल्प जनतेच्या सेवेत लोकार्पण केलेला आहे.

**५) वेदांत नगर येथे जलतरण तलाव व मल्टी परपज हॉल बांधणे :-**

सदर संकुलाचे एकूण क्षेत्र ४०६१.०० चौ. मी. क्षेत्रावर मल्टी परपज हॉल व सहा लेनचा कव्हर्ड पोहण्याचा तलाव व त्याला लागणारे ॲमिनेटीज बांधुन मिळणार आहेत. तसेच महानगरपालिकेच्या हिश्यातील २०० चौ. मी. क्षेत्राचा हॉल बांधुन मिळणार असून सदर प्रकल्प ३० वर्षानंतर महापालिकेस हस्तांतरीत होणार आहे. त्यासाठी बांधीव क्षेत्रावर भाडेपट्टा दर रुपये ५०/- चौ.मी.प्रतिमाह मनपास मिळणार असून त्यामध्ये भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने १२% वाढ होणार आहे. सदर प्रकल्प अंतर्गत रुपये ५९,४०,०००/- एवढी रक्कम प्रिमियम म्हणून विकसकाकडून प्राप्त झालेली आहे.

**६)टाऊन सेंटर सिडको येथील स्पोर्टस कॉम्प्लेक्स परिसरात पोहण्याचा तलाव व त्याला लागणारे ॲमिनेटीज इत्यादी बांधणे :-**

टाऊन सेटंर परिसरातील क्रिडा संकूलात बी. ओ.टी. तत्वावर पोहण्याचा तलाव बांधणे व क्रिडा संकूल बीओटी तत्वावर विकसीत करणेसाठी विकसक यांचेकडुन रुपये २०,७०,०००/- एवढी प्रिमियम रक्कम प्राप्त झाली आहे. सदर प्रकल्प ३० वर्षानंतर महापालिकेस हस्तांतरित होणार आहे. त्यासाठी बांधीव क्षेत्रावर भाडेपट्टा दर रुपये ५० /- चौ. मी. प्रतिमाह मिळणार असुन त्यामध्ये भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने १२% वाढ होणार आहे.

**प्रश्न क्र.१०५**:-

मागील दहा वर्षात स्लम वसाहती अंतर्गत दलीत व मागासवर्गीय वस्ती सुधारणेसाठी केंद्र शासनाकडुन व राज्य शासनाकडुन किती अनुदान प्राप्त झालेले आहे. लेखाशिर्षकासह सविस्तर माहिती.

**बि.ओ.टी. कक्ष प्रमुख**

**उत्तर :-**

महाराष्ट्र शासनाकडुन नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेस अनुदान प्राप्त होते. सदरीलच्या अनुषंगाने मनपा हद्दीतील ज्या प्रभागात ५०% पेक्षा जास्त दलित नागरिकांची संख्या आहे आणि मागासवर्गीय प्रभागात हा निधी मुलभूत सुविधा पुरविणेच्या दृष्टीने वापरण्यात येतो. दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त झालेला निधी खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

१) सन ०६-०७ मध्ये रुपये २६८ लक्ष अनुदान प्राप्त, (२) सन ०७-०८ मध्ये रुपये ५० लक्ष अनुदान प्राप्त ,(३) सन ०८-०९ मध्ये रुपये १४५ लक्ष अनुदान प्राप्त , (४) सन ०९-१० मध्ये रुपये ४५ लक्ष अनुदान प्राप्त, (५) सन १०-११ मध्ये रुपये ५० लक्ष अनुदान प्राप्त झाले आहे.

**प्रश्न क्र.१०६**:-

सलीम अली सरोवर सुशोभिकरणाचे कामासाठी शासन अनुदान किती प्राप्त झालेले आहे.कामाचे स्वरूप (सविस्तर)कामाची सध्यास्थिती, संबधित गुत्तेदारास आजपर्यंत कोणकोणत्या केलेल्या कामाचे देयके अदा करण्यात आलेली आहे याबाबतची सविस्तर माहिती.

**बि.ओ.टी. कक्ष प्रमुख**

**उत्तर :-**

डॉ. सलीम अली सरोवर सौदंर्यीकरण व विकसित करणे बाबतच्या कामासाठी मराठवाडा विकास कार्यक्रम २००७ अंतर्गत महाराष्ट्र शासन व महानगरपालिका औरंगाबाद यांचे संयुक्त माध्यमातून सरोवर विकास प्रकल्प रक्कम रुपये ५.५१. कोटी एवढया रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यापैकी ५०% रक्कमेपैकी महाराष्ट्र शासनातर्फे रुपये २.०० कोटी एवढा निधी प्राप्त झालेला आहे. सदरील प्रकल्प विकास कामामध्ये खालील प्रमाणे कामे समाविष्ट आहेत.

१) सरोवरातील पाण्याची खोली वाढविणे साठी Desilting करणे, २) पक्षी मित्रांसाठी पक्षी निरीक्षणाकरीता २५ फुट उंचीचे आकर्षक टॉवर बांधणे, ३) सेंट्रल पाथवे चे सौदंर्यीकरण करणे ,४) मुख्य प्रवेशद्वार व सुरक्षा रक्षक केबीन तयार करणे, ५) मुख्य रस्त्यालगत Piles चे काम करून आकर्षक लोखंडी ग्रील बसविणे,६) पार्कींगची व्यवस्था करणे, ७) सरोवरात बोटिंगची व्यवस्था करणेसाठी Jetty work चे काम करणे इत्यादी.

उपरोक्त प्रस्तावित कामापैकी सद्यस्थितीत सरोवराचे Desilting करणे , सेंट्रल पाथवे तयार करणे, पक्षी निरीक्षणासाठी टॉवरचे सौदंर्यीकरणाचे काम, फेरोक्रीट कॉंक्रीट द्वारे

सौदंर्यीकरण करणे, मुख्य रस्त्यालगत Piles चे काम करणे इत्यादी कामे पुर्ण करण्यात आली असून उर्वरित मेनगेट तयार करणे, पार्किगं व्यवस्था, लोंखडी ग्रील बसविणे इत्यादी कामे प्रगतीपथावर आहे. सदरील प्रकल्पावर आजपर्यत **रक्कम रुपये ३.१४ कोटी** एवढा खर्च झालेला आहे.

**प्रश्न क्र.१०७**:-

कार्यकारी अभियंता श्री.सिकंदर अली यांच्या मार्फत बीओटी विभाग अंतर्गत कोणकोत्या कामांचे डिपीआर तयार करण्यात आलेले आहे व त्यास रितसर सर्वसाधारण सभेची व स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे काय याबाबतची सविस्तर माहिती.

**बि.ओ.टी. कक्ष प्रमुख**

**उत्तर :-**

बी. ओ. टी. प्रकल्पासाठी कोणतेही सविस्तर प्रकल्प (DPR) तयार करण्यात आलेले नाहीत.

**प्रश्न क्र.१०८**:-

जालना रस्ता ते संघर्षनगर या २४.०० मी. रूंद रस्त्यावर मागील दहा वर्षात रस्त्याची कोणकोणती कामे करण्यात आलेली आहे याची सविस्तर माहिती.

**बि.ओ.टी. कक्ष प्रमुख**

**उत्तर :-**

सदरील प्रश्न क्रंमाक स्लम विभागाशी संबधित नाही, करिता आपणांस संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्यात येतो.

**नगर सचिव**
महानगरपालिका,औरंगाबाद.

: